**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५/०७/२०१४

**मा. विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक ०५ दिनांक १५/०७/२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०३ दनांक ०५/०७/२०१४**
**सभा क्रमांक ०१ दिनांक १५/०७/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महाागरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०३ दिनांक ०५/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- महापौर**
**२) श्री. मुकेश मधुकर मोकाशी-उपमहापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | आरज प्रगती भारत | 4 | नरेश रतन मणेरा |
| 5 | मढवी बिंदू महेंद्र | 6 | डुंबरे मनोहर जयसिंग |
| 7 | मिलिंद माधव पाटणकर | 8 | उज्वला रामचंद्र फडतरे |
| 9 | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | 10 | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| 11 | स्नेहा अंकुश पाटील | 12 | मधुकर रामचंद्र पावशे |
| 13 | उषा संजय भोईर | 14 | भोईर संजय देवराम |
| 15 | आशादेवी शेरबहादूर सिंह | 16 | चव्हाण तेजस्विनी किरण |
| 17 | चव्हाण सुधाकर वामन | 18 | वाव्हळ सुभाष सिताराम |
| 19 | इंदिसे रेखाबाई मिनानाथ | 20 | संभाजी धोंडिराम पंडीत |
| 21 | प्राजक्ता प्रदिप खाडे | 22 | राधा फत्तेबहादूर सिंह |
| 23 | सुशिला संकटाप्रसाद यादव | 24 | चिंदरकर कांचन विजय |
| 25 | राजकुमार रामनयन यादव | 26 | जाधवर राधाबाई सुभाष |
| 27 | सरैय्या अमित जयसिंग | 28 | पाटील वर्षा वसंत |
| 29 | जगदाळे हनुमंत ज्ञानु | 30 | सरनाईक परिषा प्रताप |
| 31 | पालांडे दशरथ बाबुराव | 32 | भोईर विमल अर्जून |
| 33 | सरनाईक विहंग प्रताप | 34 | पाटील कल्पना हरिश्चंद्र |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | चव्हाण विक्रांत भिमसेन | 36 | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर |
| 37 | पाटील शारदा विजय | 38 | साप्ते राजेंद्र रमेश |
| 39 | लासे विजया मनोज | 40 | गौरी अनिता सुनील |
| 41 | पाटील उमेश काशिनाथ | 42 | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| 43 | देसाई सुहास सुर्यकांत | 44 | महेश्वरी संजय तरे |
| 45 | एगडे रामचंद्र हरी | 46 | नंदा कृष्णा पाटील |
| 47 | नंदिनी राजन विचारे | 48 | मंदार प्रमोद विचारे |
| 49 | वडवले संतोष वसंत | 50 | कणसे निर्मला शरद |
| 51 | वैती अशोक बारकू | 52 | बोरीटकर प्रभा अशोक |
| 53 | तायडे रामभाऊ महादेव | 54 | भोईर एकता एकनाथ |
| 55 | आशा बाबासाहेब कांबळे | 56 | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| 57 | शान मनप्रीत गुरमकसिंग | 58 | शिंदे मनोज तुकाराम |
| 59 | संगिता माणिक पाटील | 60 | काशिराम गोविंद राऊत |
| 61 | घाडीगांवकर संजय पांडुरंग | 62 | मोरे संध्या सुनिल |
| 63 | खताळ विशाखा मधुकर | 64 | जानकर योगेश तातोबा |
| 65 | फाटक जयश्री रविंद्र | 66 | फाटक रविंद्र सदानंद |
| 67 | जगताप अश्विनी अशोक | 68 | मोरे संजय भाऊराव |
| 69 | वेतकर दिपक विजय | 70 | संखे मिनल मुकूंद |
| 71 | भोसले नम्रता दिपक | 72 | म्हस्के नरेश गणपत |
| 73 | हिराकांत बेंडू फर्डे | 74 | पाटील सुजाता भास्कर |
| 75 | मोरे रुचिता राजेश | 76 | नारायण शंकर पवार |
| 77 | सोनार सारिका संजय | 78 | कोकाटे सुधीर विष्णु |
| 79 | महेश सुरेश वाघ | 80 | वाघ पुजा गणेश |
| 81 | साळवी अपर्णा मिलींद | 82 | वहिदा मुस्तफा खान |
| 83 | महेश जगन्नाथ साळवी | 84 | साळवी मनोहर रामा |
| 85 | पाटील मनाली मिलींद | 86 | मनिषा महेश साळवी |
| 87 | मेघना सुनिल हंडोरे | 88 | पाटील मिलींद भारत |
| 89 | लोखंडे सुहासिनी सुनिल | 90 | केणी मुकूंद बाळू |
| 91 | अनिता अरुण बिर्जे | 92 | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| 93 | पाटील मालती रमाकांत | 94 | सामंत विलास शिवराम |
| 95 | रेखा भालचंद्र पाटील | 96 | संजय संतू वाघुले |
| 97 | नाईक राजश्री सुनिल | 98 | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |

| | | | |
|---|---|---|---|
| 99 | राजेश भालचंद्र गवारी | 100 | राजे गिरीश अनंत |
| 101 | ठाकुर अक्षय अनंत | 102 | यादव रिटा राजनाथ |
| 103 | कळंबे मंगल चंद्रकांत | 104 | काकडे बालाजी दगडू |
| 105 | कुरेशी साजिया आई | 106 | कुरेशी यासीन अय्युब |
| 107 | आसिया यासिन कुरेशी | 108 | विश्वनाथ भगत |
| 109 | किणे राजन नारायण | 110 | भगत सुधीर रामचंद्र |
| 111 | मिरजा जमेला तबस्सूम इनायत बेग | 112 | पाटील रेश्मा रमेश |
| 113 | आशरीन इब्राहीम राऊत | 114 | पठाण अशरफ उस्तान |
| 115 | शेख रजिया इकबाल | 116 | अफिजा नसीरुद्दीन नाईक |
| 117 | पाटील शैलेश मनोहर | 118 | खान मिराज नईम |
| 119 | मुंडे सुनिता गणेश | 120 | हिरा सिताराम पाटील |

**गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे :**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पांडे संजय श्रीनाथ | 2. | नजीब सुलेमान मुल्ला |
| 3. | केणी प्रमिला मुकूंद | 4. | पाटील अवंतिका शशिकांत |
| 5. | गोटे सिंधू कुंदन | 6. | खान रऊफ अफजल |
| 7. | डोंगरे सिराज महम्मद अली | 8. | अन्सारी साजिया परवीन सरफराज |

**रजा सदस्य खालीलप्रमाणे :**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | विलास चंदू कांबळे | 2. | भारत अभिमन्यु चव्हाण |

प्लाझा बांधणेसाठी रु.५० लक्ष तरतूद सुचविण्यांत आली आहे. पोखरण रोड नं.१ व २ येथे मिनी स्टेडियम बांधणेसाठी रु.१ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे.

पोखरण रोड नं.२ येथे आर.ओ.बी.बांधणेसाठी रु.४ कोटी; कॅडबरी येथे आर.ओ.बी.बांधणेसाठी रु.७.५० कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे.

व्यायामशाळेत साहित्य पुरविणेसाठी रु.२ कोटी, आऊटडोअर फिटनेस साहित्य बसविणेसाठी रु.२ कोटी वाढ सुचविण्यांत आली आहे. मानपाडा परिसरात महिलांसाठी व्यायामशाळा बांधणेसाठी रु.५० लक्ष तरतूद सुचविण्यांत आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपकरणे खरेदीसाठी रु.२ कोटीची वाढीव तरतूद सुचविण्यांत आली आहे, तर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात डायलेसीस व सिटी स्कॅन सेवा पुरविणेसाठी रु.२.५० कोटी वाढीव तरतूद व इतर रुग्णालयात डायलेसीस सेवा पुरविणेसाठी रु.२ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे.

प्रभागात मलवाहिन्या टाकणेसाठी रु.२.५० कोटी वाढीव तरतूदीसह एकूण रु.५ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे.

ठाणे महानगरपालिका परिवहन सेवा सक्षम व्हावी ही सर्वच ठाणेकरांची इच्छा आहे. यासाठी परिवहन सेवेमधील कर्मचा-यांची प्रलंबित देणी देणेसाठी रु.१५ कोटी अशी एकूण रु.२० कोटी वाढीव तरतूदीसह परिवहन सेवेस एकूण रु.४५ कोटी निधिची शिफारस करण्यांत येत आहे.

सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकातील फेरबदलाचा तपशिल स्थायी समिती ठराव क्रमांक ७/८ मध्ये नमूद आहे. या सर्व फेरबदलासह मा.सथायी समितीने शिफारस केलेल्या सन २०१३-१४ च्या रु.१६०० कोटींच्या व सन २०१४-१५ चा रु.२३५५ कोटींच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० नुसार मान्यता द्यावी अशी मा.महासभेस विनंती करीत आहे.

मा.स्थायी समिती सभापती म्हणून काम करीत असतांना, आपण सर्वांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून माझे निवेदन संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

मा.महापौर :

या ठिकाणी मा.सभापती स्थायी समिती हयांनी सन २०१३-१४ चा सुधारीत अर्थसंकल्प व २०१४-१५ चा मूळ अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मी सन्मा.सदस्यांना विनंती करतो की जमा व खर्चाच्या बाजूने त्यांचे अर्थसंकल्पाबाबतचे विचार व सूचना सभागृहात मांडावेत.

**श्री.नरेश मणेरा :-**

मा.महापौर महोदय, देशातील नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकांमुळे ठाणे महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकावर या आर्थिक वर्षाचे दोन महिने उलटून झाल्यावर चर्चा होत आहे. सन २०१४-१५ सालासाठी प्रशासनाने मांडलेला २१६६ कोटींचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीने त्यामध्ये १८९ कोटींची वाढ करुन एकूण २३५५ कोटींचा अर्थसंकल्प मा.महासभेपुढे सादर केलेला आहे.

मात्र एकंदरीतच महापालिकेची सद्याची खालावत चाललेली आर्थिक स्थिती पाहता हे अंदाजपत्रक म्हणजे निव्वळ मोठमोठया आकडयांचा खेळ ठरु नये असे वाटते. कारण दरवर्षी अंदाजपत्रक भारदस्त बनविले जाते. मोठमोठे प्रकल्प योजना व कामांची घोषणा केली जाते. मात्र वर्षभराचा कालावधी गेल्यावर त्यापैकी ब-याच योजना प्रकल्प, घोषणा केवळ कागदावरच राहिलेले दिसतात. याचे एक कारण निधीची उपलब्धता हे असू शकते. मात्र दुसरे महत्वाचे कारण प्रशासनाचा सुस्त, दिशाहीन व नियोजनशुन्य कारभार हे आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते.

मागील वर्षी महापालिकांमध्ये जकातीऐवजी स्थानिक संस्था कर एलबीटी सुरु करण्यांत आला. पहिलेच वर्ष असल्याने आणि सुरुवातीला झालेल्या व्यापा-यांच्या असहकारामुळे स्थानिक संस्था करापासून अपेक्षित असणारे उत्पन्न मिळू शकले नाही. मात्र लोकसभा निवडणूकीतील दारुण पराभवामुळे राज्यातील आघाडी सरकारकडून जकातीऐवजी लागू केलेला एलबीटी रद्द करण्याचा विचार सुरु आहे. एलबीटीला सशर्त पर्याय न दिल्यास महापालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक गळचेपी होऊन स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिकदृष्टया दुबळया व परावलंबी होण्याची भिती आहे.

म्हणूनच महापालिकांनी उत्पन्नाचे नविन मार्ग शोधणे ज्या-ज्या करांपासून उत्पन्न मिळणार आहे त्यांची प्रभावी वसूली करणे, आणि खर्चात काटकसर यासारखी आर्थिक शिस्त ही त्रीसूत्री अंमलात आणावी लागेल.

इमारत बांधून तयार असून या भागाचे प्रचंड नागरीकरण व या भागात महापालिकेची आजपर्यंत कोणतीही आरोग्यसुविधा नसल्याने या ठिकाणी बांधून तयार असलेल्या इमारतीमध्ये यावर्षी रुग्णालय सुरु करणे गरजेचे असल्याने या शिर्षकाखालील १० कोटींची तरतूद १५ कोटी इतकी करणेस विनंती आहे. आरोग्य सेवा सुविधांना प्राधान्य असावयास हवे.

पान क्रमांक १०८ महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी २०१३-१४ साठी २०१३-१४ साठी २० कोटी इतकी तरतूद असतांना प्रत्यक्षात मात्र ४.५ कोटी रक्कम खर्च झालेली दिसते. महिला व बालकल्याण समिती अस्तित्वात नसल्याने तसेच प्रशासनाची महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठीचे उपक्रम राबविणेबाबतची उदासिनता व दिरंगाई त्याला कारणीभूत आहे. तेव्हा या वर्षी असलेल्या २० कोटी तरतूदीचा महिला व बालकल्याणकार्यक्रमासाठी पुरेपूर वापर व्हावा अशी अपेक्षा आहे.

पान क्रमांक ११० - उद्यान विभाग, स्थापत्य कामे यासाठी सन २०१३-१४ साठी ६ कोटी तरतूद असूनही प्रत्यखात खर्च २.६७ कोटी .माझ्या प्रभागात ४.५ कोटी रक्कम खर्च झालेली दिसते. महिला व बालकल्याण समिती अस्तित्वात नसल्याने तसेच प्रशासनाची महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठीचे उपक्रम राबविणेबाबतची उदासिनता व दिरंगाई त्याला कारणीभूत आहे. तेव्हा या वर्षी असलेल्या २० कोटी तरतूदीचा महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी पूरपूर वापर व्हावा अशी अपेक्षा आहे.

पान क्रमांक ११०,-उद्यानात खेळणी बसविणे यासाठीची दोन कोटीची तरतूद चार कोटी करणेस विनंती आहे.

पान क्रमांक ११२-सायन्स पार्कसाठी फक्त २५ लाखांची तरतूद आहे. त्यातून कोणती कामे करणार ?

पान क्रमांक ११६-डॉ.घाणेकर नाटयगृह विद्युत व स्थापत्य कामे यासाठी मागील वर्षी ५० लाखांची तरतूद प्रत्यक्षात खर्च २२ लाख. आता या वर्षी १.२५ कोटींची तरतूद हे नाटयगृह दोन वर्षापूर्वीच सुरु झाले असून इतक्या लवकर आणखी कोणती विद्युत व स्थापत्य कामे बाकी आहेत, सदर तरतूद जास्त वाटत असून, ती ५० लाख इतकी करावी. उर्वरीत ७५ लाख अन्य कामांसाठी वापरता येतील.

पान क्रमांक १२६ तांत्रिक सल्लागार फी २०१३-१४ साठी १.५ कोटी , प्रत्यक्षात खर्च २६.३८ लाख. यावर्षी तीन कोटी तरतूद, इतकी तरतूद कशासाठी ? कोणती कामे यासाठी प्रशासनाच्या नजरेसमोर आहेत ? आतापर्यंत कोणत्या व किती कामांसाठी तांत्रिक सल्लागार नेमण्यांत आले ? त्यापैकी किती व कोणती कामे झाली ? आणि तांत्रिक सल्लागार नेमूनही किती व कोणती कामे पुढे झालीच नाहीत व त्यापोटी किती रक्कम तांत्रिक सल्लागार फी म्हणून फुकअ गेली याच प्रशासनाने खुलासा करावा अशी माझी मागणी आहे.

मेटो प्रकल्प भविष्यात होणार असतांना LRT साठी सल्लागार नेमून पैसे फुकट घालविणे योग्य आहे का ?

पान क्रमांक १३०- प्रभाग कार्यालय बांधणेसाठी फक्त १.५७ कोटी तरतूद अपुरी आहे. ती किमान तीन कोटी करणे आवश्यक आहे. कारण घोडबंदर रोड येथील ओवळ प्रभाग कार्यालय महापालिका होऊन ३२ वर्षे झाली तरी अद्याप बांधण्यांत आलेले नाही. या भागात प्रचंड नागरीकरणामुळे येथे प्रभाग कार्यालयाची नितांत जरुरी आहे.

पान क्रमांक १३६- ढोकाळी मिनी स्पोर्टस कॉम्प्लेक्स अनुषंगीक कामे यासाठी प्रशासनाकडून ७.४२ कोटी तरतूद प्रस्तावित असतांना त्यात १० कोटी वाढ करुन १७.४२ कोटी करण्यांत आली असून, इतक्या मोठया वाढीची खरोखरच गरजे आहे का याचा विचार मा.महासभेने करावा अशी माझी विनंती असून, वाढ करण्यांत आलेली १० कोटी रक्कम अन्य अनावश्यक विकास कामांसाठी वळविण्यांत यावी.

पान क्रमांक १४० पादचारी पूल १० कोटींची तरतूद वाढवून १५ कोटी करण्यास विनंती आहे. घोडबंदर रोड येथे कासारवडवली येथील पादचारी पूलासाठी निविदा मागविण्यांत आल्या आहेत. घोडबंदर मार्गावर लहानमोठया व अवजड वाहनांची भरधाव व वेगवान वाहतूक पाहतां, या ठिकाणच्या कांचनपुष्प, साईनगर, विजय गार्डन, आनंदनगर व ओवळा या ठिकाणीही पादचारी पूल तांतडीने बांधण्याची आवश्यक आहे.

पान क्रमांक १४६-घोडबंदर सेवा रस्ते यासाठीची ५० लाखांची तरतूद वाढवून एक कोटी करणेस विनंती आहे.

८

पान क्रमांक १४६-हायवेलगत मोकळी जागा सुशोभिकरण चेकनाका ते तीनहातनाका यासाठी २ कोटी तरतूद केलेली आहे. सदर काम खाजगीकरणातू करणे शक्य असल्यास त्याचा गंभीरपणे विचार व्हावा. म्हणजेच ही दोन कोटींची तरतूद अन्य गरजेच्या कामासाठी मिळू शकेल.

पान क्रमांक १५२-शॅलो वॉटर पार्क प्रकल्प मागील दोन अंदाजपत्रकातून दिसतो आहे. हा प्रकल्प कधी होणार आहे, या अंदाजपत्रकात तर त्यासाठी नाममात्र १० लाखांची तरतूद दिसते.

पान क्रमांक १५२-गायमूख येथे विसर्जन घाट विकसीत करणे यासाठी २.२५ कोटी तरतूद. हे काम कोणत्याही परिस्थितीत या अंदाजपत्रकीय वर्षात पूर्ण करण्यांत यावे अशी विनंती आहे.

पान क्रमांक १५८- अनधिकृत बांधकामाचे नियंत्रण व निष्कासन यासाठी २.५ कोटींची तरतूद केली आहे. मात्र यासाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यांत यावा. तसा धोरणात्मक निर्णय मा.सभागृहाने घ्यावा अशी विनंती आहे.

पान क्रमांक १५८-अतिक्रमण मोहिमेसाठी पूर्णवेळ कार्यरत पोलिसांचा वेतनखर्च यासाठी ४ कोटी तरतूद केली आहे. मागील वर्षी यासाठी काहीच खर्च नाही. मग या वर्षी एकदम ४ कोटीची तरतूद गरजेची आहे काय ? दोन कोटी तरतूद पुरेशी आहे आणि पूर्णवेळ पोलिसताफा मिळाला तर प्रशासन त्याचा सदुपयोग अतिक्रमण विरोधी कारवायांसाठी सातत्याने करणार आहे का हा खरा प्रश्न आहे.

पान क्रमांक १५८ याशिवाय अतिक्रमण मोहिमेसाठी पोलिसांचे सेवाशुल्क यासाठी १ कोटी तरतूदीची शिफारस करण्यांत आलेली आहे. मागील वर्षी यासाठी प्रत्यक्षात एकही पैसा खर्च नाही. अतिक्रमणाची समस्या उलट वाढतच चाललेली आहे. अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम करणा-यांवर दंडात्मक कारवाई करुन त्यासाठीचा खर्च वसूल करावयास हवा.

पान क्रमांक १८८ - शासकीय संस्थांकडील कर्जाची परतफेड यासाठी प्रशासनाने प्रस्तावित केलेली १० कोटींची तरतूद वाढवून ती ३० कोटी करण्यांत आली आहे यामागचा उद्देश काय आहे ?

मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकातील शेवटच्या पानावर कर्जाबाबतचे विवरण दिलेले आहे. त्या विवरण पत्रातील आकडे लाखांत आहेत की, कशात याबाबत काहीच नमूद केलेले नसल्याने सदर मोठमोठया आकडयांबाबत काहीच बोध होत नाही. त्यामुळे ३१ मार्च २०१४ अखेर महापालिकेच्या डोक्यावर किती कर्ज आहे त्याबद्दल प्रशासनाने सुस्पष्ट खुलासा करणे गरजेचे आहे.

१)घोडबंदर रोड विभागातील प्रभाग क्रमांक १ हा महापालिका हद्दीतील आकाराने सर्वात मोठा तसेच गेल्या काही वर्षात झालेलया प्रचंड व सातत्याने वाढत्या नागरीकरणामुळे लोकसंख्येच्या दृष्टीनेही मोठा आहे. असे असूनही महापालिका होऊन ३२ वर्षे झाली तरी या भागात नविन प्रभाग कार्यालय बांधण्यांत न आल्याने नविन कार्यालय बांधण्यांची गरज आहे.

२)घोडबंदर रोड विभागातून सर्वच प्रकारच्या लहान-मोठया व अवजड वाहनांची सातत्याने प्रचंड प्रमाणात वर्दळ असल्याने या भागात नेहमीच होणारे जीवघेणे अपघात, मोठ-मोठया निवासी इमारती, या भागातील शाळा, महाविद्यालये, पॉलिटेक्नीक व कॅटरिंग कॉलेज, यांसारख्या शैक्षणिक संस्था, बँका मॉल व अन्य व्यापारी संस्था यामुळे या भागात आगीसारखी दुर्घटना घडल्यास तांतडीने त्यावर नियंत्रण आणून जिवीत व वित्तहानी होऊ नये यासाठी या ठिकाणी सुसज्ज अग्निशमन केंद्राची गरज आहे. मात्र त्यासाठी राखीव भूखंड असूनही सतत पाठपुरावा करुनही या भागात अग्निशमन केंद्र बांधण्याबाबत प्रशासनाकडून दिरंगाई होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडून त्यांत नागरिकांचे बळी गेल्यानंतरच सुस्त प्रशासनाला जाग येणार आहे का ?

३) या भागात स्मशानभूमी बांधकामाबाबतही महापालिकेची चालढकल, वेळकाढूपणा चालू आहे. स्मशानभूमी अभावी येथील नागरिकांना अंत्यसंस्कारांसाठी ठाणे येथील स्मशानभूमीत जावे लागते.

४)या भागातील उद्याने व मैदाने यासाठी राखीव भूखंड असतांना ते विकसीत करुन नागरिकांना उपलब्ध करुन दिले जात नाहीत. मा.आयुक्तांनी पाहणी दौ-यावेळी आदेश देऊनही ही कामे झाली नाहीत. या आर्थिक वर्षात ही कामे प्राधान्याने व तांतडीने करणेत यावीत अशी विनंती आहे.

५)घोडबंदर रोड येथील सुविधा भूखंडावर रुग्णालयासाठी बांधून तयार असलेल्या इमारतीध्यमे यावर्षी सुसज्ज व अद्ययावत रुग्णालय सुरु करणेची कार्यवाही जलदगतीने करणेस विनंती आहे.

६)गायमुख्य खाडीकिनारी प्रस्तावित सुशोभिकरण व गणपती विसर्जन घाट हे काम कोणत्याही परिस्थितीत यावर्षी पूर्ण व्हावे अशी अपेक्षा.

७)वाघबीळ ते गायमुख दुतर्फा सर्व्हीस रोड तयार करण्याचे सुरु असलेले काम यावर्षी पूर्णत्वास जाण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

८) घोडबंदर रोड येथील नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी या भागातील कासारवडवली येथे पादचारी पूल बांधणेसाठी निविदा मागविणेत आलेली आहे. या भागात कांचनपुष्प, साईनगर, विजय गार्डन, आनंद नगर व ओवळा या ठिकाणी पादचारी पूल बांधणेबाबत योग्य ती तरतूद करणेस विनंती आहे.

९) नॉर्थ झोन पाणीपुरवठा योजना व भुयारी गटारी योजना केंद्र सरकारकडून मंजूर होऊन महासभेने सुध्दा मंजूर केले आहे. या दोन्ही प्रकल्पांची निविदा काढून सदर दोन्ही प्रकल्प या आर्थिक वर्षात मार्गी लावावे ही विनंती.

१०) या भागात महापालिकेची माध्यमिक शाळा नसल्याने प्रामुख्याने आदिवासी वस्ती असलेल्या या भागातील मुलांना इच्छा असूनही इ.८ वी नंतर माध्यमिक शिक्षण घेता येत नाही. त्यासाठी या भागात नविन माध्यमिक शाळा बांधणेसाठी तरतूद करणेस विनंती आहे.

११)प्रभाग क्रमांक १ मधील टकरडा, पानखंडा व गायमुख या आदिवासी वस्ती असलेल्या भागात महापालिकेच्या १ ली ते ८ वी पर्यंतच्या शाळा आहेत. आणि या तिन्ही महापालिका शाळा अद्यापही भाडयाच्या जागेत भरतात. त्यामुळे भाडयाच्या जागेतील खोल्या अपुऱ्या असल्याने एकाच वर्गखोलीत दोन ते तीन वर्ग भरले जातात. ही येथील महापालिका शिक्षण सुविधेची लाजीरवाणी व दयनीय स्थिती आहे. मात्र महापालिका होऊन ३२ वर्षे झाले तरीही या प्रभागात शाळांसाठी भूखंड व राखीव भूखंड असूनही त्या ठिकाणी येथील आदिवासी मुलांसाठी शाळेच्या इमारती बांधण्याची सुबुध्दी प्रशासनाला होऊ नये याचे आश्चर्य वाटते. उलट या ठिकाणी शाळेसाठी भूखंड व राखीव भूखंड असूनही ते त्याच कामासाठीवापरात आणण्याच्या ऐवजी बिल्डरांच्या घशात घालण्याचा उद्योग प्रशासनातील संबंधितांकडून होत असलेले दिसते. हे प्रकार तात्काळ थांबवावे, तसेच येथील टकरडा, पानखंडा व गायमुख या आदिवासी भागात आतापर्यंत भाडयाच्या वर्ग खोल्यात भरत असलेल्या शाळांसाठी शाळेच्या नविन इमारती बांधणेबाबत ही या अंदाजपत्रकात ठोस अधिक तरतूद करण्यास माझी मा.महासभेस विनंती आहे.

यावर्षी लोकसभा निवडणूकांमुळे दोन महिने कोणती कामे झाली नाहीत आता आगामी राज्य विधानसभेच्या निवडणूक आचारसंहितेतही दोन महिने जातील. त्यामुळे प्रशासनाने सुस्तपणा सोडून गतिमान कारभार करणे गरजेचे आहे. तरच या अंदाजपत्रकातील नियोजित विकासकामे होऊ शकतील याची प्रशासनाने आणि मा.सभागृहानेही गंभीर नोंद घेणे गरजेचे आहे.

माआयुक्तांच्या अंदाजपत्रकावरील छापील भाषणात भांडवली मुल्यावर आधारीत करप्रणाली राबविण्याचे सुतोवाच करण्यांत आलेले आहे. मात्र भांडवजी मुल्यांवर आधारीत कर प्रणालीला यापूर्वी तमाम ठाणेकरांनी एकमुखी प्रखर विरोध केलेला असल्याने ही करप्रणाली पध्दत पुन्हा आणण्यासाठी अट्टाहास करु नये.

पाणीपुरवठा सेवा स्वावलंबी बनविण्यासाठी वीज आकार, कच्चेपाणी व कर्मचाऱ्यांचे वेतनामध्ये वेळोवेळी ज्या प्रमाणात घेईल त्याप्रमाणात पाणीपुरवठा आकारामध्ये बदल करण्यांत येईल. आणि त्यासाठी १ एप्रिल २०१४ रोजीचे दर आधारभूत मानण्यांत येतील असे प्रस्तावित असल्याचे मा.आयुक्तांनी अंदाजपत्रकातील भाषणात म्हटले असून ते व्यवहार्य असल्याने त्यावर विचार करणेत हरकत असू नये.

शेवटी मी ठाणे महानगरासाठी काही कामांच्या सूचना करीत असून, त्यांचा गंभीरपणे विचार करावा अशी माझी मा.महासभेला आग्रहाची विनंती आहे.

मा.महापौर सो., छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.

तद्नंतर राष्ट्रगित होऊन मा.महापौर सभेस सुरुवात करतात.

मा.सचिव सो., सभेचा अजेंडा वाचून दाखवितात.

सन्मा.सदस्य श्री.विलास चंदू कांबळे यांचा रजेचा अर्ज वाचून मंजूर करण्यांत येतो.

**प्रकरण क्रमांक ३९ :**

**विषय :** ठाणे महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५च्या मूळ अंदाजपत्रकास तसेच ठाणे महानगरपालिकेच्या मा.शिक्षण मंडळ व मा.परिवहन उपक्रमाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१४-१५च्या मूळ अंदाजपत्रकास आणि मा.वृक्षप्राधिकरण समितीच्या सन २०१३-१४चे सुधारीत व सन २०१४-१५च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत मा.स्थायी समितीची शिफारस.

----------

**मा.सचिव:**

मा.महापौर महोदय, सन्मा.सभापती स्थायी समिती हयांना मी विनंती करतो की, त्यांनी अर्थसंकल्प मा.महापौरांकडे सुर्पूद करावा.

(तद्नंतर मा.सभापती स्थायी समिती हे मा.महापौरांना अर्थसंकल्प सादर करतात.)

**मा.सभापती ( स्थायी समिती ):-**

मा.महापौर महोदय, मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व सन्मा.नगरसेवक व नगरसेविका, सर्व विभाग प्रमुख, पत्रकार, सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व बंधू आणि भिगिनींनो. .. . . ..

मा.आयुक्तांनी दिनांक १८ फेब्रूवारी २०१४ रोजी ठाणे महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज मा.स्थायी समितीला सादर केले होते. मा.आयुक्तांनी सन २०१४-१५ चे रु.२१६६ कोटीचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१३-१४ चे रु.६४६ कोटीचे सुधारीत अंदाज सादर केले होते. त्यावर मा.स्थायी समितीच्या सर्व सन्मा.सदस्यांनी विभाग प्रमुखांशी चर्चा व विचारविनिमय करुन आवश्यक त्या फेरफारांसहीत व वाढीसह सन २०१३-१४ चा रु.१६०० कोटींचा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१३-१४ चा रु.२३५५ कोटीचा मूळ अर्थसंकल्प तयार केला असून तो आपल्यासमोर मान्यतेसाठी मी सादर करीत आहे.

मा.आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकात महापालिका उत्पन्नात मा.स्थायी समितीने रु.१८९ कोटींची वाढ सुचविली आहे. यात प्रामुख्याने स्थानिक संस्था करामध्ये रु.५० कोटी, सार्वज्निक बांधकाम विभागाकडील रस्ता फोड फी मध्ये रु.२५ कोटी, अग्निशमन दलासाठी रु.२७ कोटी, शहर विकास विभागाकडे ८० कोटी व पाणी पुरवठा आकारामध्ये रु.५ कोटी व डास प्रतिबंधक आकारमध्ये रु.२ कोटी वाढीव उत्पन्न अपेक्षित केले आहे.

खर्चासाठी तरतूदी प्रस्तावित करतांना प्रामुख्याने खालील बाबींमध्ये वाढ सुचविली आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी प्रभाग सुधारणा निधीमध्ये प्रति सदस्य रु.४० लक्ष प्रमाणे रु.५२ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे. तर नगरसेवक निधी प्रती सदस्य रु.२४ लक्ष उपलंब्ध होणार आहे.

सर्व सन्मा.सदस्यांची मागणी विचारात घेऊन गटारे बांधणे रु.२४ कोटी वाढीव तरतूद सुचविण्यांत आली आहे. यात मागील वर्षीच्या स्पील ओव्हरच्या तरतूदींचा अंतर्भाव केलेला आहे.

मा.स्थायी समिती सभागृह बांधणेसाठी इमारत बांधणे मध्ये रु.२ कोटी वाढीव तरतूद सुचविण्यांत आली आहे.

उपवन फेस्टीवलसाठी रु.४ कोटी तरतूदीची शिफारस करण्यांत आली आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधकामासाठी वाढीव तरतूद रु.१.५० कोटींसह एकूण रु.५ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे.

वागळे परिसरात नाटयगृह बांधणेसाठी रु.५० लक्ष तरतूद सुचविण्यांत आली असून तीन हात नाका येथे शॉपिंग प्लाझा बांधणेसाठी रु.५० लक्ष तरतूद सुचविण्यांत आली असून, तीन हात नाका येथे शॉपिंग

महापौर महोदय, मा.स्थायी समितीने मा.महासभेपुढे सादर केलेली जमेची बाजू पहातां, मालमत्ता करापोटी ३०२ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे. त्याच किमान ८० ते ९० टक्के वसुली होणे आवश्यक असतांना आजवरची आकडेवारी पाहता ही वसुली सरासरी ६० ते ७० टक्क्यांपर्यंतच होते. काही विभागांची मालमत्ता व पाणीबिलाची थकबाकी कांही कोटीत असून या थकबाकी वसुलीसाठी कठोर प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे.

स्थानिक संस्था करापोटी ७०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे. मात्र हा करच सद्या रहाणार की जाणार अशा अधांतरी अवस्थेत आहे. एलबीटी ऐवजी अन्य पर्यायी करांमुळे ७०० कोटी इतके अपेक्षित उत्पन्न मिळेल की नाही याबद्दल साशंकताच वाटते. शहर विकास विभागातर्फे ४३५ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरले असून या विभागाने कार्यक्षमपणे व प्रभावी पणे काम केले तर तेवढे उत्पन्न मिळू शकेल. शैक्षणिक भूखंड विक्रीद्वारेचे अपेक्षित उत्पन्न मिळण्यासाठी त्याबाबतची कार्यवाही जलदगतीने व्हावयास हवी. मंजूर आराखडयापेक्षा जास्त वा अतिरिक्त बांधकाम करणा-या काही बिल्डर्सना यापूर्वी दंड आकारुन ती बांधकामे नियमित करण्यांत आली आहेत. मात्र एका ठराविक कालखंडातील अशा प्रकारची सर्वच बांधकामे दंड आकारुन नियमित केलयास त्यामुळेही महापालिकेच्या उत्पन्नात फार मोठी भर पडू शकेल.

ठाणे महापालिका हद्दीतील मोबाईल टॉवर्ससंबंधीचे धोरण महापालिकेने अद्याप ठरविलेले नसल्यास तांतडीने त्याची कार्यवाही करावी. महापालिका हद्दीतील मोबाईल टॉवर्सची संख्या मोठी असून, या मोबाईल टॉवर्सना कर आकारणी केली गेली आहे का ? नसल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने करणे आवश्यक आहे. अनेक मालमत्तांना कर आकारणीच झालेली नाही अशा मालमत्ता शोधून त्यांना कर आकारणी व्हावी. ठाणे महानगरपालिका हद्दीत असलेल्या खारीगांव येथील टोलनाका आणि वागळे चेकनाका येथील टोलनाक्याला करआकारणी केलेली आहे का ?

मागील अर्थसंकल्पात पाणी वापरासाठी मीटर बसविण्याचे प्रस्तावित केले होते. सर्वप्रथम वाणिज्य वापरासाठी असलेल्या संपूर्ण पाणीपुरवठा मीटरद्वारे करण्याचे प्रस्तावित होते. त्यानंतर निवासी वापरासाठी मीटरपध्दती सुरु करावयाची आहे. ही कामे गतिमानतेने व्हावयास हवीत. कारण अनावश्यक व भरमसाठी वापरात मीटर पध्दतीमुळे आळा बसू शकेल.या वर्षीच्या पावसाची स्थिती पाहता, पाण्यासाठी डोळयात पाणी येण्याची वेळ आली आहे.

गेल्या तीन चार वर्षांच्या जमाबाजूकडील उत्पन्नाचे अंदाज व प्रत्यक्षातील रकमा यांचा विचार केला तर असे दिसते की, महसूली उत्पन्न सरासरी ७० ते ७५ टक्के इतकेच मिळते. तर कर्जे अनुदानाचे अंदाज व प्रत्यक्ष रकमा यामध्येहीं फार मोठी तफावत असल्याचे दिसते. मागील वर्षीच्या अंदाजपत्रकातील जमा बाजूला महसूली उत्पन्नाचा अंदाज १४८४.६० कोटी धरला होत. प्रत्यक्षात हे उत्पन्न ११५२.५३ कोटी एवढे म्हणजेच ७७.६३ टक्के इतके मिळेल. कर्ज म्हणून मागील वर्शी ३४५.५८ कोटी इतके उत्पन्न धरले होते. प्रत्यक्षात मात्र ३.३९ कोटी इतकेच उत्पन्न कर्जाद्वारे मिळाले. त्याची टक्केवारी येते जेमतेम एक टक्का इतकीच. तसेच गेल्या वर्षी अनुदाने म्हणून २६९.५९ कोटी उत्पन्नाचा अंदाज धरण्यांत आला होता. मात्र प्रत्यक्षात १०६.२८ कोटी इतकेच म्हणजेच सुमारे ४० टक्के इतके उत्पन्न अनुदानाद्वारे मिळाले हे वास्तव आहे.

म्हणूनच वास्तव विचारात घेतल्यास या अंदाजपत्रकातील महसूली उत्पनचा अंदाज १७१४ कोटी असला तरी प्रत्यक्षात ७५ टक्के उत्पन्न धरल्यास ते १२८५ कोटी कर्जे ३३८ कोटी अपेक्षित धरली तरी त्याच्या ५० टक्के म्हणजे १५१ कोटी मिळू वास्तवात जमा उत्पन्न १६०५ कोटी होऊ शकेल. जमेचा अंदाज व वास्तवातील जमेचा अंदाज यामध्ये सुमारे ७५० कोटीचा फरक दिसतो. त्यामुळे १६०५ या वास्तवातील जमा उत्पन्नामधून वेतन खर्च, कर्ज परतफेड, भांडवली व इतर खर्च कसा येतील. आपण कितीही आकडयांचे खेळ केले तरी हे वास्तव सत्य असून ते नाकारुन चालणार नाही. हे वास्तव विचारात घेऊनच विकासकामे करावी लागतील. अवास्तव खर्चाला व अनावश्यक कामांना कात्री लावावी लागेल.

मा.महापौर महोदय, आता खर्च बाजूकडील माझे मत मी मांडत आहे. खर्च बाजूकडील पान क्रमांक ७० वर उपवन फेस्टीवलसाठी ४ कोटी रुपयांच्या तरतूदीची शिफारस करण्यांत आलेली आहे. मात्र महापालिकेची सद्याची आर्थिक परिस्थिती पाहता आणि सदर फेस्टीवल खाजगी संस्थेद्वारा भरविण्यांत येत असल्याने इतक्या मोठया रकमेची खरच गरज आहे का याचा विचार मा.सर्वसाधारण सभेने करणे महत्वाचे आहे. महापालिकेने मागील वर्षी प्रमाणेच सदर संस्थेस इतर सहकार्य जरुर करावे.

पान क्रमांक ९८ घोडबंदर परिसरात रुग्णालय सुरु करणेसाठी ५० लाखांची तरतूद तसेच रुग्णालये व उपकरणे व इतर साहित्य खरेदीसाठी १० कोटींची तरतूद अपूरी वाटते. घोडबंदर परिसरात रुग्णालयसाठीची

१) पार्कींग धोरण- मागील वर्षापासून महापालिका पार्कींग धोरण आणत असल्याचे सांगत असूनही अजूनही प्रशासनाला पार्कींग धोरण जाहिर करण्याचा मूहूर्त सापडलेला नाही. महानगरातील पार्कींग समस्या अत्यंत जटील व गंभीर बनलेली असल्याने तांतडीने पार्कींग धोरण मंजूर करुन त्याची अंमलबजावणी व्हावी. काही प्रमुख रस्ते आणि विशेषत: सर्व्हीस रोड अनधिकृत पार्कींगमुळे आक्रसून गेले असून, प्रशासन त्यावर कधीच व काहीच कारवाई करीत नाही. वर्ष दोन वर्षापूर्वी एक दोनदा प्रशासनाने सायकल फेरी काढून पार्किंग समस्येची पहाणी करुन त्यावर दंडात्मक कारवाई केली होती. पण तो केवळ प्रसिध्दीपुरताच स्टंट ठरला. कारण त्यानंतर कधीही अशी कार्यवाही झाली नाही.

२) मोबाईल टॉवर्सधोरण- ठाणे महानगरात आज अनेक ठिकाणी अनेक मोबाईल कंपन्यांचे मोबाईल टॉवर्स उभे आहेत. सुरक्षेच्या व अन्य कारणांसाठी हे मोबाईल टॉवर्स उभारणेसंबंधी एक धोरण निश्चित करण्याची गरज आहे. त्यांना कर आकारणी करावयास हवी. कोठेही व कसेही उभारलेल्या मोबाईल टॉवर्सवर कारवाई होणे आवश्यक आहे.

३) महिलांसाठी पंचतारांकीत प्रसाधानगृहे- मागील अंदाजपत्रकावरील मा.महासभेत झालेल्या चर्चेच्या वेळी ही मागणी मी केली होती. परंतू प्रशासनाकडून त्यावर काहीच कार्यवाही नाही. त्यावर प्रशासन ढीम्म. या अंदाजपत्रकात खास महिलांसाठी शहरातील प्रमुख ठिकाणी पंचतारांकीत प्रसाधनगृहे महापालिकेतर्फे बांधण्यांत यावी यासाठी या अंदाजपत्रकात ठोस आर्थिक तरतूद करावी अशी विनंती मा.महासभेला करीत आहे.

४)महापालिकेचे विविध दाखले, परवाने, कर आकारणी व महापालिकेसंदर्भातील नागरिकांची विविध कामांचा निपटारा किती दिवसांत केला जाणार आहे त्या संबंधीचे सविस्तर कालबध्द धोरणही महापालिकेने तयार करावे अशी माझी मागणी आहे.

५) राज्यातील अतिरेकी कारवाया तसेच महानगरातील दिवसाढवळया होणाऱ्या चेन स्नॅचिंग, लुटमार यासारख्या गुन्हयातील वाढ लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिका हद्दीतील सर्व प्रवेशद्वारे आणि प्रमुख चौकांमध्ये महापालिकेतर्फे सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यांत यावेत अशी माझी सूचना असून, सर्व सन्मा.सदस्यांनी त्याचा जरुर विचार करावा ही विनंती.

६)ठाणे महानगर स्वच्छ व सुंदर दिसणेसाठी नागरिकांत जनजागृती करणेसाठी प्रत्येक प्रभागात सनमा.नगरसेवक त्या भागातील प्रतिष्ठीत नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व संबंधित महापालिका अधिकारीयांच्या प्रभागनिहाय समित्या स्थापन करणेसंबंधी मा.महासभेने विचार करावा अशी माझी आग्रही मागणी आहे. तसेच रस्त्यांत पान खावून थुंकणारे, रस्त्यावर कचरा करणारे फेरीवाले व नागरिक, शहरात ठिकठिकाणी जाहिराती, पोस्टर्स भिंतीवर, खांबावर चिकटविणा-या सर्व संबंधितांवर दंडात्मक कारवाई करणेसंबंधीही विचार व्हावयास हवा.

७)कासारवडवली व आनंदनगर येथून जाणारा रस्ता कावेसर व हिरानंदनीकडे जात असून हा रस्ता घोडबंदर रोड येथील प्रमुख मिसींग लिंक आहे. फक्त नाल्यावर पुल बांधल्यास हा रस्ता सुरु होऊ शकतो. परंतू गेल्या दोन वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम खाते व INDP मध्ये हा पूल कोणी बांधावा हया बद्दल वाद असल्यामुळे हा मिसींग लींक चालू होऊ शकला नाही. मा.महापौर महोदय, हया पुलासाठी किमान २ कोटींची आर्थिक तरतूद करावी ही विनंती.

८) कावेसर येथील तलाव सुशोभिकरणासाठी देखिल या अंदाजपत्रकात किमान ५ कोटींची तरतूद करावी ही विनंती.

मा.महापौर महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरिता आपण मला संधी दिलीत त्याबद्दल मी आपले आभार मानतो. आणि आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

श्री.संजय घाडीगांवकर :

महापौर महोदय, आज २०१४-१५ चा अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांनी या सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवला आहे. मा.आयुक्तांनी १८ फेब्रुवारी २०१४ रोजी स्थायी समितीमध्ये मुळ अंदाजपत्रक जे सादर केले त्यामध्ये सुधारणा करुन त्यामध्ये मा.सभापती व सन्मा.सदस्यांनी सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीकरीता सभागृहापुढे आणले आहे व त्याकरीता व मा.सभापती-स्थायी समिती व सर्व सन्मा.सदस्यांचे अभिनंदन करतो . अर्थसंकल्प मांडत असताना त्यामध्ये त्यांनी ज्या विविध सूचना केल्या आहेत, जी प्रस्तावित कामे दाखविली आहेत ती चांगली असुन ती व्हायलासुध्दा पाहिजे. परंतू ही कामे करण्याकरीता आपल्या महापालिकेचा आर्थिक कणा आता किती मजबुत आहे व भविष्यात किती मजबुत राहणार आहे याकडे प्रशासनाने जास्त लक्ष दयावे. कारण शेवटी प्रशासनाला काम करायचे आहे. सभागृहात सदस्य सूचना करतील, अपेक्षा मांडतील व ती अपेक्षापुर्ती व हिशोबाचा ताळेबंद हा नुसता फुगवुन सांगण्यापेक्षा याबाबत प्रत्यक्षात कांय अंमलबजावणी केली गेली पाहिजे व ती कशी केली पाहिजे याबाबत जर प्रशासनाने व्यवस्थित कार्यवाही केली तर आज जी एलबीटीच्या नावाने ओरड चालू आहे ती कोठेतरी थांबेल व महापालिकेचा आर्थिक कणा जो ढासळला आहे तो सुधारेल. ज्याप्रमाणे पाठीचा कणा मोडुन माणुस वाकला जातो त्याप्रमाणे महापालिकेचे वाकलेले चित्र आज सगळीकडे दिसुन येत आहे आणि हे अतिशय खेदजनक आहे. वास्तविक पाहता प्रशासनाच्या कांही चुकीच्या धोरणांमुळे आणि चुकीच्या कार्यपध्दतीमुळे आज महापालिकेचा आर्थिक कणा ढासळला आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

महापौर महोदय, एलबीटी विभागाचे तसेच उपायुक्त तसेच त्या टिमचे खरोखर अभिनंदन करतो कारण एवढया क्रिटीकल पोझिशनमध्ये त्यांची वसुली एप्रिल ते जुन २०१४ च्या काळामध्ये १४८ कोटीपर्यंत गेलेली आहे. आणि मार्च अखेर २०१४ पर्यंत ५५२ कोटीपर्यंत गेली म्हणजे जवळपास ८० टक्क्यापर्यंतचा टप्पा त्यांनी गाठला होता, तरीसुध्दा एलबीटीच्या नावाने बोंबाबोंब केली गेली की एलबीटी वसुली झाली नाही म्हणून. एलबीटीबाबत व्यापा-यांमध्ये जो संभ्रम निर्माण झाला त्याचा परिणाम हा वसुलीमध्ये झाला याबाबत कोणाचेच दुमत नसेल. परंतू महापालिकेचा एलबीटी हा एकच स्त्रोत होता कां, बाकीचे उत्पन्नाचे मार्ग नव्हते कां? आज आपण जुनमध्ये १४८ कोटी वसुल केले आहेत, आज एलबीटीचे उत्पन्न ज्यापध्दतीने त्या कर्मचा-यांनी वाढविले त्याबाबत मी त्यांना धन्यवाद देत आहे, एक ठाणेकर नागरीक म्हणून मी त्यांचे आभार मानतो. कारण एवढया कठीण काळामध्ये त्यांनी असे चांगल्याप्रकारचे काम केले आहे. मग इतर विभागाने हे कामकाज कां केले नाही याचा बोध आयुक्तांनी घेतला पाहिजे. आणि हे उत्पन्न कां घटले याचा शोध घेतला पाहिजे. आज आपण पाहिले तर गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी आणि तेथील प्रशासनाने एलबीटी हे चांगली व्यवस्था असुन त्यायोगे उत्पन्न कायमस्वरुपी राहील फक्त त्यामध्ये सुसुत्रता आणली पाहिजे,त्यातील नियम हे प्रशासनाला जाचक ठरता कामा नये त्यामध्ये दरी निमार्ण होता कामा नये याबाबत सामंजस्य राखुन एलबीटी राबविली गेली तर तो सर्वात चांगला मार्ग आहे. व हे आज सर्व लोकांनी मान्य केले आहे. आज मी मा.मुख्यमंत्री तसेच शासनाला धन्यवाद देतो कारण ही एक चांगली प्रणाली आहे परंतू आज एलबीटी विरोधात वातावरण चालु

आहे त्या वातावरणामुळे आज फक्त ठाणे महापालिका धोक्यात नाही तर सर्व नगरपालिका पंचायतीसुध्दा धोक्यात आल्या आहेत. आणि शासनावर जो आरोप केला गेला तो चुकीचा आहे हे कालांतराने लोकांच्या लक्षांत येत आहे, मला फक्त एवढेच म्हणायचे आहे प्रत्यक्षात जी अंमलबजावणी असते तसेच जी सध्यस्थिती आणि वस्तुस्थिती असते त्यावर नागरीकांनी लक्ष ठेवले पाहिजे.

आज जकातीची असंख्य प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये कांही कोर्टाचे दावे आहेत, तरी त्याची पुढील कार्यवाही स्थगित कां ठेवली गेली? ठाणे न्यायालयाने देखिल कोर्टाच्या पेंडींग केसबाबत वेगळे एक धोरण आणले होते त्याचनुषंगाने आपणसुध्दा एक वेगळे धोरण आणले असते आणि प्रशासनाने सभागृहात मांडले असते तर त्यास मान्यता मिळुन आज जी कोटयावधी रुपयांची जकात वसुली पेंडींग आहे ती वसुल झाली असती आणि आज महापालिका आर्थिक संकटात सापडली आहे त्याला आधार मिळाला असता. तरी माझी विनंती आहे की याबाबत प्रशासनाने गांभिर्याने लक्ष दयावे आणि तडजोडीचे प्रकरणे न्यायालयामध्ये बसुन ती मिटवावीत आणि जॉईंटली सत्यप्रतिज्ञा सादर करुन ती मिटविली तर कोटयावधी रुपये महसुल आपल्याला मिळु शकेल. व हा महसुल नागरीकांकरीता वापरण्यास मिळेल.

त्याचप्रमाणे मालमत्ता कर आणि पाणीपट्टी या वसुलीवर जो परिणाम झाला आहे त्याची दोन कारणे आहेत. आगामी विधानसभा निवडणुका आणि आत्ताच झालेली लोकसभा निवडणुक. ज्यापध्दतीने निवडणुक आयोगाने प्रशासनातील आपल्या अधिकारी/कर्मचारी यांना यादीचे पुर्ननिरिक्षण, बुथ लिडर, बुथ लेवल ऑफीसर, नविन मतदार यादीची नोंदणी करणे तसेच त्यांची वोटींग कार्ड वाटप करणे,वोटी स्लिप वाटणे या कामासाठी आपले कर्मचारी ज्यापध्दतीने राबले गेले, हे कर्मचारी सकाळी या कामासाठी बाहेर जायचे ते रात्री अकरापर्यंत घरी सुध्दा जायचे नाही. यात असे सुध्दा कांही कर्मचारी आहेत की ते दुस-या दिवशी घरी जात असत. काही कर्मचारी यांनी तर त्यांच्या त्यांच्या मित्राच्या घरी राहुन हे कामकाज केले आहे व ही वस्तुस्थिती आहे. यातील दुसरी बाजु हीसुध्दा आहे की आपल्याकडे असलेला अपुरा कर्मचारीवर्ग. कारण जर एका एका अधिका-याकडे दोन ते तीन चार्ज असतील तर तो अधिकारी त्याचे काम तसेच निवडणुकीचे कामकाज त्याचप्रमाणे शासनाची गणना तसेच आयोगाचे सर्व्हेक्षण ही सगळी कामे म्हणजेच एक अधिकारी/कर्मचारी जर पाच पाच कामे करत असेल तर तो एकातरी कामाला न्याय देऊ शकतो कां? व यामुळे याचा १०० टक्के परिणाम हा मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये आणि पाणीपट्टीच्या वसुलीवर झाला आहे आणि एलबीटीच्या नावाने बोंब झाली . अदयापसुध्दा आपण मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीच्या देयकाचे बिल नागरीकांपर्यंत पोहचवली गेली नाहीत. नागरीकांकडुन आज ज्यापध्दतीने प्रतिसाद मिळत आहे. कोणताच नागरीक महापालिकेचे देणे बाकी ठेवत नाही. ते ज्यापध्दतीने महापालिकेच्या सुविधा वापरतात त्याचे ते देणे देत आहेत. आणि वेळ पडली तर आपण जे २४ टक्के आकार घेतो ते सुध्दा नागरीक भरतात . परंतू प्रशासनाकडुन कांही चुका झाल्या आहेत . यापुर्वी पाणीपट्टी आणि मालमत्ता कर हे एकत्रच बिल होते त्यामुळे वसुलीला फायदा व्हायचा. मागिल तीन वर्षाची जर तुम्ही वसुली पाहिली तर ती जवळपास ९८ कोटीपर्यंत आपण पोहचलो होतो. तसेच मालमत्ता कर व पाणीपट्टी जी आकारणी केली ती प्रत्येक भागामध्ये राबविली गेली आहे का तसेच किती वसुली बाकी आहे याबाबतचा अहवाल ठेवण्यांत आला आहे कां? राजकीय दबावाने जी अनधिकृत कनेक्शन दिली गेली ती कनेक्शन नियमाकुल करुन घेणे त्या नागरीकांना समजावणे हा सुध्दा एक वसुलीचा भाग होत आहे. पाणीपट्टीची ३० ते ३५ टक्के

उत्पन्नामध्ये तसेच पाण्यामध्येसुध्दा गळती आहे. नुसती ओरड करुन कांहीच होत नाही प्रशासनाने याबाबत ठोस अंमलबजावणी केली पाहिजे. प्रशासनाचे ते अधिकारी काम करीत आहेत तुम्हीसुध्दा माणसे आहात तुमच्या घरीसुध्दा परिवार आहे, उदया तुम्हाला पगार मिळणे मुश्किल होईल. आणि त्यावेळी हे सभागृह तसेच ठाणेकर नागरीक जबाबदार राहणार नाही. प्रशासनाला जर एक शिस्त आणि सवय नसेल तर कामकाज कसे होईल. महापौर महोदय, याबाबत आपण पाहिले तर या कामकाजाच्या पध्दती जुन्या आणि रटाळ आहेत. एक एक टिप्पणी ठेवायला त्यांना १० ते १५ दिवस लागतात, नंतर अधिका-याची सही घ्यायला महिना जातो म्हणजे जी टिप्पणी ज्यावेळामध्ये सादर केली गेली पाहिजे त्याची जी मंजुरी घेतली गेली पाहिजे ती घेतली गेली जात नाही. मार्चचा विषय जुनमध्ये येतो. मार्चचा विषय जर मार्चमध्येच आणला व त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे, वेळेवर कामे केली गेली पाहिजे. त्यामुळे उत्पन्नामध्ये १०० टक्के फरक दिसेल.

महापौर महोदय उत्पन्नाचे दुसरे स्त्रोत म्हणजे शहरविकास विभागः त्यांचे स्वतःचे डिसीआर आहेत. आज सोळा वर्षे झाली आपण शहराच्या मंजूर विकास आराखडयाची अंमलबजावणी करु शकलो नाही. ज्या शेतक-यांनी ज्या जमिनीच्या मालकांनी त्यांच्या जमिनी दिल्या आणि कांही विकासकांनी कवडीमोलाने त्या घेऊन त्यावर त्यांनी त्यांचे इमले बांधुन विकले, परंतू ज्यांच्यावर आपण आरक्षणे टाकली व ती आपण उठवली नाही तर त्यामध्ये त्यांचा कांय दोष. किंवा आपण ती आरक्षणे ताब्यात घेतली नाहीत. व यापध्दतीने प्रशासनाकडुन कामकाज केले गेले आहे. शहरविकास आराखडयाची जर व्यवस्थित अंमलबजावणी केली गेली असती तर अनधिकृत बांधकामाचे शहर म्हणून आपल्या शहराची बदनामी झाली नसती. आज लोक अनधिकृत बांधकामामध्ये कां घरे घेत आहेत कारण त्यांची आर्थिक परिस्थिती पाहता त्यांच्याकडे दुसरा पर्यायच नाही. ज्याप्रमाणे हे ठाणे औदयोगिक क्षेत्राची वसाहत होती, उत्पन्नाचे स्त्रोत होते सामान्य गोरगरीब आपली रोजीरोटी म्हणून येथे वर्षानुवर्षे रहायला येत असे मग राहण्यासाठी छोटे घर पाहिजे घर स्वस्तमध्ये मिळते म्हणून घर घेतले गेले. महापौर महोदय, शहरविकास विभागाच्या डीसीआरप्रमाणे कामकाज करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. तरी त्यांनी आज जी घट दाखविली आहे ती दुप्पट होऊ शकते. आणि उत्पन्नाचे स्त्रोत वाढले जाईल. आज विकास प्रस्ताव दाखल केल्यापासुन ते वापर परवाना देईपर्यंत त्या विकास प्रस्तावाच्या फाईलीमध्ये किती फेरफार केली गेली ,पाहणी अहवाल ऑफीसमध्ये बसुन होतो कां, यामध्ये आपल्या प्रशासनातील मुख्य अधिकारीसुध्दा सामिल आहेत व हा माझा स्पष्ट आरोप आहे. उत्पन्न वाढवायचे असेल डीसीआरप्रमाणे कामकाज करणे आवश्यक आहे. नाहीतर कँपाकोला इमारतीप्रमाणे या शहरातील कित्येक नागरीकांचे आर्थिक व मानसिक नुकसान होईल. आणि या सर्व लोकांचे शाप प्रशासनाला लागतील. प्रशासनाने सांगितले की आज २०० इमारती अनधिकृत आहेत मग त्या विकास प्रस्तावाबाबत,उत्पन्न वाढीबाबत, त्या नागरीकांना दिलासा देण्याबाबत कोणतेतरी धोरण सभागृहापुढे आले कां? महापौरांनी कधी असे केले आहे की तुम्ही एखादा विषय पटलावर दिला आणि महापौरांनी घेतला नाही असे कधी झाले आहे कां, तुमचे आयत्यावेळेचे कितीतरी विषय साहेबांनी घेतले आहेत. आणि या सभागृहाने त्यास एकमताने संमतीसुध्दा दिलेली आहे. आजज्या २०० इमारती आहेत त्यामध्ये राहणारे नागरीक हे ठाणेकर नागरीक आहेत. त्यांनी देखिल कर दिला आहे. त्यांची फसवणुक झाली आहे मग ते विकासक कोण आहेत? त्यांचेवर कारवाई करणे गरजेचे

आहे. कँपाकोलाप्रमाणे या नागरीकांची परिस्थिती होता कामा नये म्हणून एक धोरण सभागृहापुढे आणुन महासभेची परवानगी घेऊन शासनाची परवानगी घेऊन तो विषय संपला असता व उत्पन्न वाढेल तसेच नागरीकांना न्याय मिळेल. परंतू याबाबत प्रशासनाकडुन कांहीच आले नाही. माझ्या मते प्रशासन वृत्तपत्राकडे अगोदर जाते, याठिकाणी मला पत्रकारांना सांगायचे आहे की माझा त्यांचेवर आरोप नाही. नाहीतर त्यांचे असे म्हणणे होईल की घाडीगांवकर आमच्याविरोधात बोलत आहेत. विषय आहे की याबाबत धोरणात्मक कांही निर्णय व्हावा. आज त्या २०० इमारतीमधील जवळजवळ एक हजार नागरीक कोठे जातील. ते रस्त्यावर येतील. कँपाकोलामधील सहा लोकांचा वर्षभरात मृत्यु झाला . महापौर महोदय, याबाबत माझी सूचना आहे की शहरविकास विभागाने कांहीतरी धोरण सादर करावे. जेणेकरुन उत्पन्न वाढेल त्या लोकांना दिलासा मिळेल. आणि हा विषय कायमस्वरुपी संपुन जाईल. नाहीतर आयत्यावेळी ब्लॅकमेलींग चालु होते मग तो अधिकारी कांहीतरी सेंटींग करतो,विकासकाला सेंटींग घ्यायला लावतात. आणि मग पुन्हा ते पेंडींग राहते. आणि जे मोठेमोठे बिल्डर आहेत, ज्यांनी टाऊनशिपचे प्रस्ताव दिले आहेत त्या सर्व प्रस्तावांची पुन्हा छाननी केली गेली पाहिजे. ज्या पध्दतीने त्यांचे विकास प्रस्ताव मंजुर केले गेले आहेत. ते सर्व नियमानुसार आहेत कां, ज्या शेतक-यांच्या जमिनी घेतल्या गेल्या आहेत,जी आरक्षणे उठली गेली आहेत,उत्पन्न वाढीचे हे एक साधन आहे आपण दंडाची रक्कम म्हणून घेतली तर लाखो-करोडो रुपये आपल्याला उत्पन्न मिळु शकेल. फक्त बांधकामे तोडुन दंडाची रक्कम वसुल होत नाही. बांधकामे कशी तोडली जातात हयाचे प्रात्यक्षिक आम्ही पाहिले आहे, सादर केले आहे. त्या बांधकामाचासुध्दा खर्च तुम्ही वसुल करीत नाही. तुम्ही फक्त एवढी एवढी थकबाकी आहे अतिक्रमण विभागाकडे एवढेच दाखवता.

महापौर महोदय आपण रस्ताखोदाईला परवानगी देतो ,आणि त्यांच्याकडुन मेजरमेंटप्रमाणे पैसे घेतो. संबंधित जी कांही शासकीय संस्था असेल किंवा कोणतीतरी खाजगी संस्था असेल त्यांना दिलेल्या मेजरमेंटच्याबाहेर जाऊन ते खोदकाम करतात आणि चांगल्या रस्त्याची वाट लावुन टाकतात. त्यावेळी ते पहात नाहीत की महापालिकेच्या विदयुतच्या पोल्स गेल्या आहेत,जलवाहिन्या गेल्या आहेत व ड्रेनेज पाईप असतात, तसेच जेथे परवानगीच दिली नाही ,समजा तुम्ही अल्मेडा रोडला परवानगी दिली तर तो तीच परवानगी सगळीकडे फिरवणार आणि पुढेपर्यंत खोदत नेणार. महापौर महोदय ज्यावेळी या खोदकामाच्या परवानग्या दिल्या जातात आणि जेव्हा खोदकामाला सुरुवात होते त्यावेळी तेथील कार्यकारी अभियंता यांनी आणि शहरविकास विभगाच्या कार्यकारी अभियंता यांनी संयुक्तिकरित्या कार्यवाही घेतली किंवा पाहणी केली तर जे चुकीचे खोदकाम होते व महापालिकेचे नुकसान होते ते नुकसान होणार नाही. तसेच चुकीचे खोदकाम केले असेल तर त्याबाबत दंडाची रक्कम जी कमी करण्यात आली आहे ती वाढवुन ज्याप्रमाणे जकात आपण दहापट घ्यायचो त्याच पध्दतीप्रमाणे कोणतीतरी अशी सूचना आणा व अशाप्रकारच्या चुका करणा-यांना एक आळा बसला जाईल. व महापालिकेचे उत्पन्न वाढेल. मागच्यावेळी प्रशासनाने रिलायन्स ४जीच्या केबलसाठी प्रायोगिक तत्वावर परवानगी दिली परंतू संबंधित रिलायन्सच्या अधिका-यांनी कांय केले तर परवानगी एका ठिकाणी परंतू चार ठिकाणी टॉवर उभे केले. त्यांच्याकडुन दंड वसुल केला का, की ते आपले जावई आहेत? महापौर महोदय त्यांच्याकडुन दंड वसुल कां करण्यांत आला नाही? ज्यापध्दतीने रिलायन्सला परवानगी दिली जाते त्यांच्याकडुन ज्या चुका झाल्या आहेत त्याबाबत प्रशासनाकडुन पांघरुण घातले गेले आणि कांही राजकीय लोकांकडुन घातले जात आहे. आज त्यांनी पुर्ण शहरभर केबलचे जाळे टाकुन ठेवले आहे व रस्त्याचे खोदकाम केले आहे. ते काम त्यांनी पुर्णपणे नियमामध्ये बसुन केले आहे कां? महापौर महोदय मंजुरीपेक्षा जास्त खोदकाम करण्यांत आलेले आहे. आणि प्रशासनाने त्याबाबत कांहीच

कारवाई केली नाही. तसेच टॉवरबाबतसुध्दा त्यांचेवर एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्यांत आला नाही. परंतू दंडाची रक्कमसुध्दा वसुल करण्यांत आली नाही. या सभागृहामध्ये मा.आयुक्तांचे स्टेटमेंट होते की, याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल, असे असताना आयुक्त साहेब त्यांनी केलेले स्टेटमेंट कां फिरवले? म्हणजेच प्रशासन स्वतः येथे उत्पन्नाचे स्त्रोत कमी करीत आहे.

महापौर महोदय उत्पन्नाचे आपल्याकडे विविध मार्ग आहेत, परंतू कांही मोजक्याच गोष्टीवर मी बोलणार आहे. जाहिरात कर - माझी या सभागृहाला विनंती आहे की, आपल्याकडुन जे बॅनर लावले जातात आपण जेव्हा १०० बॅनर लावतो आणि लाख रुपये खर्च करतो तर दहा हजार रुपये महापालिकेची फी भरण्यास कसली लाज. बॅनर लावुन शहराचे जे विद्रुपीकरण केले जाते त्या त्या प्रभागाच्यासहा.आयुक्तांनी जे बॅनर लावले जातात त्यांची पावती नसेल,पावतीची झेरॉक्स नसेल तर ते बॅनर काढले पाहिजे किंवा शहर विद्रुपीकरण फलक ॲक्टनुसार संबंधितांवर गुन्हे दाखल करा,त्यांच्याकडुन दंडाची रक्कम वसुल करा, आज शहराच्या दुभाजकावरसुध्दा बॅनर असतात, रस्त्यावरुन गाडयांना येताजाता त्याचा त्रास होतो,यामुळे अपघात होतात. बॅनर लावुन लोकांच्या गॅलरी,खिडक्या बंद केल्या जातात. आज आपण बॅनर झोन नक्की केले आहे परंतू त्याची अंमलबजावणी केव्हा करणार? आपण भरपुर गोष्टी नक्की करुन देतो परंतू प्रशासनाकडुन त्याची अंमलबजावणी कांहीच होत नाही. महापौर महोदय माझी सूचना आहे की शहराच्या सौंदर्याच्यादृष्टीकोनातून ज्याप्रमाणे आपण गार्डनचे काम करीत आहोत ग्रीनरी करीत आहोत परंतू या ग्रीनरीला गालबोट लागणारे बॅनरचे विषय आहे त्यावर कडक कारवाईचे धोरण आणावे आणि महसुलामध्ये त्यातुन वाढ होईल, हे जरी छोटे छोटे मार्ग असले तरी बुंद बुंद से सागर बनता है या हिशोबाप्रमाणे प्रशासनाने जर कामकाज केले तर या छोटया मार्गातुन अशा कठीण परिस्थितीमध्येसुध्दा आपले उत्पन्न स्थिर राहील. आज आपली जी परिस्थिती निर्माण झाली आहे किंवा दाखविली जात आहे तशी होणार नाही. महापौर महोदय, प्रत्येकवेळी नविन आयुक्त आले की त्यांच्या डोक्यामध्ये नविन कल्पना असतात की मी महापालिका क्षेत्र असे रंगवीन तसे रंगवीन मग माझी सिटी ही सिंगापुर किंवा हॉंगकॉंग दिसेल. परंतू या शहराचे सिंगापुर करताना प्रत्येकवेळी कंसलटंटच्या नावाखाली जे लाखो रुपये खर्च होतात. याबाबत कोणतीतरी एक ठाम योजना असायला पाहिजे. प्रत्येकवेळी नविन प्रशासकीय अधिकारी येतात नंतर ते दोन ते अडीच वर्षाने निघुन जातात परंतू त्यांनी आल्याआल्या त्या योजनेवर कामकाज केले किंवा पुर्वीच्या आयुक्तांनी जी योजना दिली होती त्यामध्ये कांय त्रुटी आहेत याबाबत एकदाचसखोल अभ्यास केला तर कंसलटंटवर आपला जो लाखो रुपयांचा खर्च होतो तो कुठेतरी थांबेल. महापौर महोदय तुमच्या काळामध्येच एलआयटीचा प्रस्ताव आला होता ती एक चांगली योजना होती व आपण चालु करणार होतो त्यास सभागृहाने मान्यता सुध्दा दिली होती, परंतू त्याचे कांय झाले आता तुमचा महापौर पदाचा कार्यकाल संपत आला आहे परंतू त्या योजनेबाबत प्रशासनाकडून शुन्य कार्यवाही. महापौर महोदय आपल्यासुध्दा लक्षांत आले असेल की स्कायबस,एलआयटी,रिंगरुट रेल्वे,मेट्रो, ट्राम. आता शासनाने एक योजना दिली आहे तरी त्याबाबत एक ठोस निर्णय होऊन एक धोरण नक्की करा. आपण कंसलटंटवर किती खर्च करतो याबाबत जर हिशोब केला सार्वजनिक विभागाच्या भांडवली विभागाचे जे बजेट आहेत्याच्या दहा टक्के हे यांच्यासाठीच खर्च केले जातात.

म्हणजे जवळपास १०० कोटी रुपये तर या दोन ते तीन वर्षामध्ये वाया गेले आहेत.महापौर महोदय प्रशासनाला गांभिर्याने कामकाज करण्याकरीता आपण त्यांचेवर वेगळा अंकुश आणलाच पाहिजे. त्यांनाही समजले पाहिजे की महापौरांनी जर ॲक्शन घेतली तर ती फार मोठी असणार आहे.

महापौर महोदय उत्पन्नाचे दुसरे महत्वाचे आपला स्थावर मालमत्ता विभाग हा आपण निर्माण केला परंतू आपल्या ज्या स्थावर मालमत्ता आहेत,त्यांच्याकडुन मिळणारे उत्पन्न आणि त्यांचेवर होणारा खर्च ,म्हणजे आपल्या मालमत्ता आपण नीट सांभाळायच्या नाहीत, त्यातुन मिळणारे उत्पन्न हे रेडीरेकनरपेक्षा कमी आहे . मग ते तरण तलाव असुदया ,भूखंड असुदे किंवा कोणती केंद्र असुदे. त्यांचे भाडे हे आरआरप्रमाणेच केली गेली तर उत्पन्नामध्ये नक्कीच भर पडेल. परंतू प्रशासन कोठेतरी दबले जाते कारण मोठया मोठया लोकांशी यात संबंध आहेत. परंतू त्यांचे हितसंबंध जपण्याकरीता आपण ठाणेकर नागरीकांवर बोजा टाकणार कां? महापौर महोदय, उत्पन्न असेल तर महापालिका चालणार आहे, नागरी कामे होतील, प्रोजेक्ट करता येतील. आज मा.उपमहापौर यांनी रस्त्यांच्या कामाबाबत प्रस्तावाच्या सूचना दिल्या म्हणजे विचार करा की मंजूर विकास आराखडा किती बाकी आहे व रस्ते बनवायला महापालिकेकडे पैसेच नाहीत. म्हणजे उपमहापौर बनल्यानंतर त्यांच्या प्रभागातील लोक त्यांना विचारतील की साहेब रस्ते कोठे आहेत व ते कधी बनणार? महापौर महोदय प्रत्येक वेळी विषय येतो तो अंमलबजावणीवरच येतो आणि ही अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही आणि ती कां होत नाही याबाबत मा.आयुक्तांनी बारकाईने परिक्षण केले पाहिजे. १०० बैठका घेऊन रिझल्ट मिळत नाही. याकरीता रस्त्यावर उतरले पाहिजे, त्या त्या परिसरामध्ये गेले पाहिजे. नुसतेच दौरे करुन नंतर योजना देणे हे भूषणावह नाही. ज्यापध्दतीने उत्पन्न वाढायला पाहिजे परंतू याकरीता कोणते धोरण आणले हे जर प्रशासनाने सांगावे. आपल्याकडे कामकाज करण्यासाठी शिस्त नाही यामध्ये पुर्णपणे बेशिस्तपणा आला आहे. जे लिपिक तसेच कनिष्ठ अभियंता काम करतात तेच बळीचे बकरे होतात. रस्त्यावर उतरणे हे अधिका-याचे काम नाही कां? एसी कॅबिनमध्ये बसुन फक्त मिटींग घेणे,नोटींग करुन नंतर मा.आयुक्त सो यांच्या मंजुरीनुसार महासभेकरीता सादर नंतर आपल्याकडे आल्यानंतर आपण म्हणतो की प्रशासनाने दिले आहे तर मंजुरी देऊन टाकु कारण हे एक चांगले काम आहे. परंतू वस्तुस्थितीत ते चांगले काम कितपत करतात? महापौर महोदय याला कारणीभुत प्रशासनामध्ये असलेला समन्वयाचा अभाव, अपुरा अधिकारीवर्ग ,लिपिक, सहा.आयुक्त, प्रभाग अधिकारी. महापौर महोदय या डिसेंबरअखेर महापालिकेमध्ये ५० टक्के स्टाफ राहणार आहे. बाकी सर्व रिटायर होणार आहेत. मग अशावेळी पुढील कामकाज कसे होणार आहे? वसुली कशी होणार, उत्पन्न कसे वाढणार? हे सर्व प्रशासनाला माहित होते तर प्रशासनाने वेळेवर उपाययोजना कां केली नाही? मी कॅफो साहेबांचे आभार मानतो की एलबीटीचा धोका वेळेवर पाहुन किंवा एलबीटी वसुली होत नाही हे पाहुन त्यांनी जी आर्थिक तरतुद केली ,जे आर्थिक नियोजन केले त्यामुळे कितीतरी नगरसेवकांचे प्रभाग व्यवस्थित बनले आहेत. शहरातील कामे व्यवस्थित झाली आहेत. परंतू महापौर महोदय आपण जो स्पिलओव्हर बघतो आहोत तर त्या स्पिलओव्हरमध्ये आणि आत्ताचे अंदाजपत्रक यातील फरक जर पाहिला तर चालु असलेली कामे कशी पुर्ण करणार की नविन कामांना आपण हात घालणार की चालु कामे बंद करणार असा मोठा प्रश्न त्या त्या अधिका-यांसमोर आला असेल परंतू याला सर्वस्वी जबाबदार प्रशासनातील समन्वयाचा अभाव

हेच आहे. जेव्हा प्रशासन इमानदारीमध्ये त्यांचे कामकाज करेल, कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही तर या चुका होणारच नाहीत. कोणती चौकशीच लागणार नाही. महापौर महोदय मा.आयुक्तांनी परिपत्रक काढले आहे. याबाबत मला एक प्रश्न पडला आहे की, डिफर पेमेंटच्या नावाखाली ज्या पध्दतीने चार ते पाच वेळा निविदा रिं-कॉल होतात,मग रिंग होते व मोजक्याच तीन कंपनीचे टेंडर येतात. महापौर महोदय डेफर पेमेंटच्या नावाखाली जेवढया निविदा काढण्याचा प्रयत्न चालला आहे, निविदा काढा कामे झाली पाहिजेत, परंतू यामध्ये कॉंपिटीशन वाढले पाहिजे. एकदाच हजार कोटीचे टेंडर काढण्यापेक्षा ते प्रभागवाईज करावे,ज्या अटी शर्ती प्रशासनाने टाकल्या आहेत त्या मोजक्या कंपन्यासाठीच कां? जर कॉंक्रिटचा विषय आहे माझ्याकडे पुरावे आहेत जे कामकाज झाले आहे ते चुकीच्या पध्दतीने झाले आहे. आणि ज्या कंपनीचे हे टेंडर आहेत आज तेच कां टेंडर घेतात कारण आज त्यांच्यासाठी त्या अटी शिथिल केल्या जातात, त्यांच्या हिशोबाने त्या अटी बनवल्या असतात मी याबाबत मध्यंतरी आयुक्तांनासुध्दा सांगितले होते आज हया ज्या निविदा आल्या आहेत त्याबाबत मला पुर्ण विश्वास आहे की त्या ३० टक्के अबाऊच आहेत,आज आपण त्यांना पैसे देणार आणि व्याजाने त्यांना पैसे पेड करणार शिवाय अबाऊ निविदा . महापौर महोदय महापालिकेला टाळं लावावे लागेल आणि उदया कोठलातरी ठेकेदार कोर्टात जाईल आणि त्याच्या बिलाच्या थकबाकीच्या वसुलीकरीता आपल्या महापालिकेच्या वस्तुंवर जप्ती येईल. कोणत्यातरी एका महापालिकेच्या आयुक्तांची खुर्ची जप्त करण्यांत आलीअसा प्रकार आपल्या महापालिकेत व्हायला पाहिजे कां? महापौर महोदय हया ज्या निविदांच्या पध्दती आहेत यामध्ये सुसुत्रता आणली पाहिजे आणि डेफर पेमेंटच्या निविदा या पुर्णपणे रिकव्हर करुन त्या प्रभागसमितीनिहायच केल्या पाहिजेत त्या एकत्रित निविदा नको. कारण कांही मोजक्या राजकीय लोकांच्या हितसंबंध जपण्याकरीता त्यांच्या माणसांना टेंडर मिळण्याकरीता त्यांच्या संबंधित कंपन्यांना टेंडर मिळण्याकरीता हया निविदा बनविल्या गेल्या आहेत आणि याबाबत संबंधित जे कार्यकारी अभियंता असतील ज्यांनी या निविदेचे कामकाज पाहिले आहे यांची सखोल चौकशी व्हावी ,ते किती वर्ष एकाच ठिकाणी आहेत,त्यांची बदली कां होत नाही,त्यांच्याकडे एकच विभाग कां राहतो हे सुध्दा पाहणे गरजेचे आहे. सतत एखादयाच्या हाती सत्ता राहिली की अधिकाराचा दुरुपयोग होतो . आज ज्या पध्दतीने कामकाजामध्ये अनियमितता आली आहे ती कोठेतरी थांबली पाहिजे आणि महापालिकेच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ दिसली पाहिजे नुसते एलबीटीच्या नावाने ओरडुन चालणार नाही. शासनाच्या नावाने बदनामी केलेली चालणार नाही, आपण कोठे चुकलो याचेसुध्दा आत्मपरिक्षण करणे गरजेचेआहे. महापौर महोदय उत्पन्नाबाबत मी बोललो त्यावर सूचना केल्या परंतू मला वाटत नाही याबाबत प्रशासन कितपत अंमलबजावणी करेल. तसेच आपले किती आदेश पाळेल याबद्दल माझ्या मनात संशयच आहे, कारण आजपर्यंत आपण जेवढे आदेश दिले आहेत या सभागृहामध्ये त्याची अदयाप अंमलबजावणी झालेली दिसत नाही. ते सांगतात आम्ही करतो तुम्ही एकदा चेक करा की तुमच्या एवढया कालावधीमध्ये दिलेल्या आदेशाची कितपत अंमलबजावणी झाली आहे हे पहा. आज अर्थसंकल्पावर प्रत्येक सदस्य हा पोटतिडकीने बोलत असतो, मा.सभागृहनेते यांनी सांगितले की नागरीकांनी सुध्दा सहभाग घ्यावा.परंतू सदस्यांच्या सूचनांचा आदर होत नाही तर नागरीकांच्यासूचनांचा तुम्ही कांय आदर करणार. शेवटी जे पेराल तेच उगवणार आहे आणि तेच करायचे आहे आणि तेच बघायचे आहे परंतू कोठेतरी थांबा नाहीतर लोकं थांबवतील. महापौर महोदय, दुनिया बदलली आहे अच्छे दिन आये है तरी या हिशोबाने कामकाजामध्ये पारदर्शकता यायला पाहिजे.

महापौर महोदय मी प्रशासनाला धन्यवाद देऊन प्रशासनातील माआयुक्त महोदय, मुख्य वित्त अधिकारी ,मा.सभापती स्थायी समिती तसेच सर्व गटनेते यांनी हा अर्थसंकल्प बनविण्यामध्ये जे योगदान दिले त्या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी कशी व कितपत करतात हेच मला पहायचे आहे. कारण आम्ही जे बोलते त्याबाबतचे गांभिर्य दिसत नाही, परंतू येणारा काळ या गांभिर्याची दखल घ्यायला लावेल एवढे बोलुन आपले आभार मानतो. धन्यवाद.

श्रीमती जयश्री फाटक :

महापौर महोदय,मा.उपमहापौर,मा.आयुक्त, मा.स्थायी समिती सभापती, मा.सभागृह नेते,मा.विरोधी पक्षनेते सर्व सन्मा.नगरसेवक व नगरसेविका, सर्व विभागप्रमुख, पत्रका,सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व बंधू-भगिनींनो,

मा.आयुक्तांनी सन २०१४-१५ चे रु.२१६६ कोटीचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१३-१४ चे रु. १६४६ कोटीचे सुधारीत अंदाज सादर केले होते. त्याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन मा.स्थायीसमितीने सन २०१३-१४ चा रु. १६०० कोटीचा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१४-१५ चा रु. २३५५ कोटीचा मूळ अर्थसंकल्प तयार करुन मा.महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवलेला आहे.

सन २०१४-१५ चा रु. २३५५ कोटीचा अर्थसंकल्प तयार करण्यांत आलेला आहे. मा.आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या २१६६ कोटीमध्ये मा.स्थायी समितीने रु.१८९ कोटीची वाढ सुचविलेली आहे.

मा.आयुक्तांनी सुचविलेल्या उत्पन्न स्त्रोताच्या २१६६ कोटीपैकी महापालिकेचे महसुली उत्पन्न १७१४ कोटि दर्शविण्यांत आले आहे. त्यात प्रामख्याने एलबीटीचे ७०० कोटि व विकास कर ४३५ कोटि व मालमत्ता कर ३०३ कोटि इतके उत्पन्न अपेक्षित आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आजपर्यंत स्थानिक संस्था कराची एकुण १४७.३० इतकी रक्कम वसुल झालेली आहे. स्थानिक संस्था करास व्यापा-यांचा होणारा विरोध पाहता या आर्थिक वर्षात अपेक्षित रक्कम महापालिकेकडे जमा होणार किंवा नाही याबाबत गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

तसेच बांधकाम व्यवसायामध्ये सध्यस्थितीत मंदीचे वातावरण आहे. विकासक या व्यवसायामध्ये अतिशय मंदीचा अनुभव घेत आहेत. अशा परिस्थितीत नविन इमारतीचा विकास खुंटा असल्याने हव्या त्या प्रमाणात विकास कर वसुल होईल किंवा कसे? याबाबत देखिल गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

महापालिकेचे उत्पन्न प्रामुख्याने एलबीटी,विकास कर, मालमत्ता कर व पाणी करवर अवलंबुन असल्याने उत्पन्नाच्या परिस्थितीचे अवलोकन करुन खर्चाची बाजु मांडणे अपेक्षित आहे. तसेच या वर्षात स्पिलओव्हर अंदाजे ६०० कोटीच्या आसपास आहे. याबाबत साकल्याने विचार होणे आवश्यक आहे.

ठाणे महानगरपालिकेने ठाणेकरांच्या सोयीसाठी परिवहन सेवा चालु केलेली आहे. सदर परिवहन सेवा सक्षम करण्यासाठी मा.स्थायी समितीने रु.४५ कोटि निधीची शिफारस केलेली आहे. ती नक्कीच कौतुकास्पद आहे.

वागळे परिसरांत नाटयगृह बांधणे, तीनहात नाका येथे शॉपिंग प्लाझा बांधणे, पोखरण रोड नं.१ व २ येथे मिनी स्टेडियम व आर.ओ.बी. बांधणे, विकास आराखडयातील रस्ते बांधणे,छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात सिटीस्कॅन व डायलेसिस सेवा पुरविणे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक बांधणे, महिलांसाठी व्यायामशाळा बांधणे, कळवा पुल बांधणे अशाप्रकारची कामे या अर्थसंकल्पामध्ये अंतर्भुत आहेत व ते ठाणे शहराच्या विकासाच्यादृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने खालील उपाय सुचविण्यांत येत आहेत.

१. एलबीटीबाबत व्यापा-यांशी बैठका घेऊन एलबीटी कर भरणेबाबत त्यांना प्रवृत्त करणे.

२. नव्याने झालेल्या इमारतीचे सर्व्हेक्षण करुन कर आकारणी करुन वसुली करणे.

३. विकासकांना नियमानुसार योग्यत्या सवलती देऊन विकास शुल्क वसुल करणे.

मा.महापौर :

आता जेवणाची सुट्टी करीत आहोत व पुन्हा दुपारी ठिक ३.०० वा.सभा पुर्ववत सुरु करण्यांत येईल.

**(जेवणाच्या सुट्टीनंतर ३.४५ वाजता सभा सुरु होते.)**

**मा. महापौर :**

सभेला सुरूवात करा, महिलांनी बजेटवर बोला.

**श्रीमती सुजाता पाटील :**

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका पत्रकार बंधू आणि सर्व अधिकारी वर्ग.. ..

ठाणे महानगरपालिकेचा सन २०१३-२०१४ चा सुधारित अर्थसंकल्प १६६४ कोटी व सन २०१४-२०१५ चा मूळ अर्थसंकल्प रूपये २१६६ कोटीच्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक मा. स्थायीसमितीने सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर केलेले आहे. ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हा अर्थसंकल्प खरोखर विकास साधणारा आहे. मालमत्ता कराचे उत्पन्न ३३५ कोटी ५९ लाख इतके दाखविण्यात आलेले आहे. गेल्या आर्थिक वर्षात मालमत्ता कराचे उत्पन्न ३११ कोटी इतके अपेक्षीत होते. परंतु ते उत्पन्न गेल्यावर्षी २२ कोटीने कमी झालेले आहे. या उत्पन्न वाढीसाठी मालमत्ता कर खात्यामध्ये कर्मचारी वर्ग वाढविण्यांत यावा त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.. त्यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग वाढविण्यात यावा किंवा इमारतीचे सर्वेक्षणाचे काम एखाद्या संस्थेस देण्यात यावे. सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात मालमत्ता कराच्या कर योग्य मूल्यावर २ टक्के निवारा अधिभार लावण्यात येणार आहे तो अधिभार लावणे योग्य नसून तो अधिभार रद्द करण्यांत यावा असे मी सभागृहाला सुचवित आहे.

ठाणे शहराचा पाणी पुरवठा उत्तम असून ठाणेकर नागरीक समाधानी आहेत. परंतु ठाणे महापालिकाहद्दीमध्ये खाजगी शाळा आहेत, त्या शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्यासाठी जे पाणी वापरतात त्या पाण्याची बिले बिगर घरगुती दराने पाठविली जातात. ही पाण्याची बिले घरगुती दराने पाठविली जावी अशी शिफारस मी सभागृहाला करीत असून तसा ठराव करण्यात यावा. त्यामुळे शाळांना भुर्दंड बसणार नाही व या आर्थिक वर्षापासून त्यांना घरगुतीदराने बिले पाठवावी. सर्व नगरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन जाहिरातीद्वारे करण्यांत यावे.

ठाणे शहरात प्रसाधनगृहे महिलांसाठी आवश्यक बाब असून तीन हात नाका, मासुंदा तलाव, ठाणे स्टेशन अशा सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी चांगल्या प्रकारची प्रसाधनगृहे बांधण्यात यावीत. त्यासाठी अर्थसंकल्पात १ कोटीची वेगळी तरतूद करावी. त्यासाठी प्रत्येक नगरसेवकाचा २५ हजारांचा निधी घेण्यात यावा व ठाणे शहरामधील आमदार-खासदार यांच्याकडून त्यांच्या निधीची मागणी मा. महापौरांनी करावी असे मी सभागृहाला सूचवित आहे.

ठाणे शहरात हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी रुग्णवाहिका, शववाहिका कमी पडत आहे, याबाबत नवीन रूग्णवाहिका, शववाहिका घेण्याबाबत या अर्थसंकल्पात तरतूद करावी व प्रत्येक प्रभाग कार्यालयात एक रूग्णवाहिका देण्यात यावी असे मला सूचवायचे आहे.

ठाणे शहरात शाळा-कॉलेज विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अभ्यासिका निर्माण करण्याची गरज असून अशा अभ्यासिका ठाणे महापालिकेमार्फत बांधून संस्थेला चालविण्यास द्याव्यात. त्यामुळे शैक्षणिक सोय उपलब्ध झाल्यास ठाणेकर आपणांस आशिर्वाद देतील.

ठाणे महापालिकेतील नगरसेवकांना नागरिकांची अनेक कामे करावयास लागतात, त्यामध्ये असंख्य अडचणी असतात, त्यामध्ये यावर्षी अंदाजपत्रकात प्रभाग सुधारणा निधीची तरतूद करण्यात आलेली दिसत नाही. वॉर्डामधील कामे करण्यासाठी या निधीची जरूरी असून यावर्षी प्रत्येक नगरसेवकाला रूपये २५ लाख प्रभाग सुधारणा निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी असे मी सभागृहाला सूचवित

असून तशी मागणी सर्वांनी करावी. आत्ताच सन्मा. सभापतींनी त्यांच्या निवेदनात सांगितले की, प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी यांची तरतूद ४० लाख व नगरसेवक निधी २४ लाख असे सूचविण्यात आली आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

ठाणे महापालिकेच्या शहर विकास खात्याकडून रूपये ३५५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. ते उत्पन्न महापालिकेस मिळणार आहेच. परंतु खात्याकडून नौपाडा भागातील रस्ता रूंदीकरणाची कामे होत नाहीत. डी.पी.रस्ते त्यांची कामे व्हायला पाहिजेत असे वाटते. त्यासाठी नगरसेवकांनी पत्रे देवूनसुध्दा रस्ता रूंद करण्यासाठी निधी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ठाणे शहराचा विकास करताना या गोष्टी होणे जरूरीचे आहे याकडे मा. आयुक्तांनी लक्ष घालावे. शहर विकास खाते चांगल्याप्रकारे काम करते या खात्यामधील नागरिकांसाठी सर्व प्रकारची माहिती मिळण्यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग नेमण्यात यावा.

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये प्रभाग कार्यालये आहेत, या कार्यालयात ज्येष्ठ नागरीक पाण्याची आणि कराची बिले भरावयास येतात. त्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बसण्याची व्यवस्था प्रसाधनगृहे अशा सुविधा महापालिकेमार्फत कराव्यात अशी मला सूचना करावयाची आहे.

महापौर महोदय, आता सध्या सर्व ठिकाणी सुधारणा करीत आहात परंतु नौपाडा प्रभागसमितीकडे सर्वांचे दुर्लक्ष आहे. नौपाडा प्रभागसमितीचे जे कार्यालय आहे त्या इमारतीला जवळ-जवळ ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. सदरहू जागा मार्केटसाठी आरक्षण आहे, या जागेवर प्रभाग समिती कार्यालय आहे. ही इमारत तोडून नवीन बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी पार्किंगची व्यवस्था करावी हे शक्य असून त्यासाठी अर्थसंकल्पात ५ कोटीची तरतूद करावी असे मी सुचवित आहे.

ठाणे महापालिकेच्या ड्रेनेज विभागासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद असूनसुध्दा नागरिकांची कामे होत नाहीत. तेथील कर्मचारी वर्ग व नेमलेले ठेकेदार यांच्यामार्फत ड्रेनेजसफाई, चेंबरसफाई, चोकअपची कामे होत नाही. त्यासाठी तेथे जबाबदार अधिकारी नेमावा, गाड्या उपलब्ध असूनसुध्दा नागरिकांची कामे होत नाहीत, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते. तसेच त्या खात्याचे काम चांगले होण्यासाठी नवीन चांगल्या सेक्शनच्या गाड्या घ्याव्यात अशी तरतूद अर्थसंकल्पात करावी. ठाणे महापालिकेच्या अंदाजपत्रक तरतूद केल्याप्रमाणे ठाणे शहरात यूटीडब्ल्यूटी, डांबरीकरणाचे रस्ते, रस्तारूंदीकरण, कळवा-खारेगांव सुलभ वाहतुकीसाठी नवीन पूलाचे बांधकाम, घोडबंदरला जोडणारे नागरिकांसाठी समांतर पध्दतीचे रस्ते, ब्रह्मांड येथे पादचारी पूल, ठाणे रेल्वे परिसर सुधारणा, पार्किंग प्लाझा, तलावाचे सुशोभिकरण, स्वच्छ ठाणे शहर, नवीन डंपिंग ग्राऊंड, नवीन मार्केट, नवीन शाळा, क्रिडा संकुले, तरण तलाव, मा.शिवसेनाप्रमुख बाळासाहब ठाकरे यांचे स्मारक, आरोग्य व वैद्यकीय सेवा, ज्येष्ठ नागरिकांसाठी मदतीच्या योजना अशा अनेक सुविधा ठाणे महापालिकेतर्फे अंदाजपत्रक तरतूदीमधून करण्यात येणार आहेत. या तरतूदीमधून ठाणे शहराचा सर्वांगीण विकास होणार आहे ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे.

ठाणे शहराच्या विकासामध्ये भर घालणारा हा अर्थसंकल्प व त्यामध्ये सुचविलेले बदल याबाबत सभागृहात विचार करून मंजूर करावे. सन २०१४-२०१५ चे मूळ अंदाजपत्रकास सभागृहाने मंजरी द्यावी. मा.आयुक्त साहेब व मा. स्थायी समिती सभापती यांनी सादर केलेले अंदाजपत्रक खरोखरच ठाणे शहराचा सुंदर विकास साधणारा आहे असे मनापासून वाटते. या सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार!

जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्री. मनोहर डुंबरे :**

मा. महापौर महोदय, आजच्या २०१४-१५ च्या अर्थसंकल्पासाठी आयोजित केलेल्या महासभेमध्ये स्थायी समितीचे सभापती मा.श्री.सुधाकरराव चव्हाण साहेबांनी फार सुंदर आणि सुटसुटीत आणि थोडक्यात अर्थसंकल्पावर भाषण केले. . खरोखरच एवढया थोडक्या शब्दामध्ये सर्व सार त्यांनी भाषणामध्ये आणलेले आहे. परंतु आजची उपस्थिती पाहता, अर्थसंकल्पावर एवढा निरूत्साह का? यावर विचार केला पाहिजे. सभागृहामध्ये विरोधी पक्ष नेते नाही, सभागृह नेते नाहीत, आयुक्त नाहीत, गटनेते नाहीत. बरेचसे सभासद नाहीत. तरी याच्यावर नक्कीच विचार झाला पाहिजे. जे नवीन नगरसेवक निवडून आले आहेत, काही जुने नगरसेवक आहेत परंतु अर्थसंकल्पावरील सभेमध्ये ही उपस्थिती का? भाषण करण्याची इच्छा राहिलेली नाही. कारण जबरदस्तीने कोणाला भाषण करायला उठवायला लागते आहे. कारण या सगळ्या आकडेमोडी आम्ही जे अर्थसंकल्पावर जी भाषणे केली, ज्या सूचना केल्या त्यांचा विचार कधी केलेला नाही. त्यामुळे फुकटचं भाषण करायचे, आमचे विरोधी पक्ष नेते आलेत. सभागृह नेते तर नाहीच. अच्छे दिन आनेवाले असं समजायचे का आम्ही ? म्हणजे हा अनुपस्थितीचा आकडा जर पाहिला तर खरंच प्रशासनावरचा आमचा विश्वासच उडाला आहे. कारण आम्ही केलेल्या सूचना, प्रस्ताव याला केराच्या टोपलीत टाकल्याचा हा प्रकार होतो आहे. म्हणून आमच्या बऱ्याच नगरसेवकांना इच्छा असतानाही ते म्हणतात की आम्ही बोलू शकतच नाही. कारण ना महापौरांचे लक्ष आहे, ना प्रशासनाचे लक्ष, आयुक्तांचे लक्ष नाही. ऐकतचं नाही तुम्ही चर्चा करतात, महापौर, उपमहापौर आमच्याकडे दुर्लक्ष करत आहेत अशी आमची भावना आहे.

**मा. महापौर :**

सन्मा.सदस्य डुंबरे साहेब, भावना व्यक्त करीत असताना एक लक्षात घ्या, आपण बजेटवर बोलत आहात, महापौरांचे लक्ष नाही. महापौर कशाला बसले आहेत, माझे तुमच्याकडे लक्ष आहे.

**श्री. मनोहर डुंबरे :**

मा. महापौर महोदय, आम्ही सकाळपासून पाहतो आहे, आम्ही चर्चा करतो आमची भाषणे चालली आहेत, तुमच्या वेगळया चर्चा चालल्या आहे, बजेटवर लक्ष दिले पाहिजे. आम्हाला बोलायला हा एकच दिवस मिळतो.

**मा. महापौर :**

बजेट स्थायी समिती बनवते तुम्हाला माहिती आहे ना.

**श्री. मनोहर डुंबरे :**

मा. महापौर महोदय, म्हणून आम्ही बोलू नये का? स्थायी समिती बनवते सर..,

**मा. महापौर :**

महापौरांचे लक्ष नाही म्हणजे तुमच्या बोलण्याचा अर्थ समजला नाही. महापौरांचे काय लक्ष पाहिजे म्हणजे नक्की काय?

**श्री. मनोहर डुंबरे :**

मा. महापौर महोदय, आमची मंजुरी लागते, त्यामुळे जे विचार आम्ही गांभिर्याने मांडतो ते आपण ऐकून घ्यावेत अशी आमची विनंती आहे.

**मा. विरोधी पक्ष नेते :**

महापौर महोदय, बजेटला एक दिवस नाही. जेवढे दिवस चालेल तेवढे दिवस चालवायचे आपल्याला कुणाचेही बंधन नाही. आरामात सगळ्यांना बोलू द्या. बोलायचं तेवढं सगळं बोलून टाका.

**श्री. मनोहर डुंबरे :**

मा. महापौर महोदय, त्याचा फायदा होणार आहे का? पंधरा दिवस बोलायंचे. बोलून काही फायदा होणार असेल तर बोललेलं बरं. आम्ही बोलतो, बोलू तर द्या. काही बोलायची इच्छा राहिलेली नाही.

मा. महापौर महोदय, आजचा जो अर्थसंकल्प आपण सादर केला आहे. तर आपल्याकडे स्पील ओव्हर जास्त असल्यामुळे आम्ही नवीन सूचना करण्यापेक्षा, प्रस्ताव मांडण्यापेक्षा, आपण उत्पन्नाच्या गोष्टींवर सगळ्या नगरसेवकांनी विश्वस्त म्हणून उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष द्यायला पाहिजे, आणि ती काळाची गरज आहे. आपण प्रत्येक प्रभागामध्ये कशा पध्दतीने त्याचे वाटप होईल ते करण्यापेक्षा फक्त उत्पन्नवाढीचे एकमेव साधन एलबीटी हेच पाहतो आहे, आणि त्या एलबीटीवरच घाला घालतो आहे. एलबीटीमधून उत्पन्न जास्त वाढले पाहिजे आणि तेच आपण खर्च केले पाहिजे. पण या एलबीटीपेक्षा उत्पन्नाची दुसरी काही साधने शोधता आली तर त्याचा आपण शोध घेतला पाहिजे. जे काही आपले खर्च होत आहेत, त्या खर्चावर कसा निर्बंध आणता येईल, त्याचे कसे नियोजन करता येईल त्याकडे लक्ष दिले पाहिजे. उदा. ठाणे महानगरपालिकेत आणि ठाणेनगरीमध्ये नेहमीच एक चर्चेचा विषय असतो पांढरा हत्ती. पांढरा हत्ती कोणते असे हत्ती आपल्याकडे पाळलेले आहेत. आपल्याकडे दादोजी कोंडदेव स्टेडियम असू द्या, गडकरी रंगायतन असू द्या किंवा डॉ.काशिनाथ घाणेकर नवीन नाट्यगृह आहे, तरण तलाव आहेत, सर्वात मोठा हत्ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय आणि त्याला जोडून असणारे महाविद्यालय. या सगळ्यांवर आपला अमाप खर्च होतो आहे असे नागरिकांना वाटते आहे. परंतु हे हत्ती पाळणे खरेच पौराणिक काळापासून, राजराजवाड्यापासून आपण हत्ती पाळणे हे मानाचे मानत होतो आणि खरेच आपण ज्यावेळेला ठाण्याच्या बाहेर चर्चा करतो किंवा जातो तेव्हा ठाणेकर खरेच मान उंचावून छाती फुगवून सांगतो की आमच्याकडे वास्तू आहेत, दादोजी कोंडदेव स्टेडियम आहे. आमच्याकडे दोन नाट्यगृह आहेत, तरणतलाव आहेत, ही ठाण्याची शान आहेत आणि हे तोट्यात जरी चालले तरी आपले कर्तव्य आहे की, हे आपल्याला सांभाळणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय तोट्यात जरी चालले असेल तर त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. ते नियोजनबध्द चालवले आणि त्यात पारदर्शकता आणली तर खरंच ते हॉस्पिटल.., आज आरोग्य देणे आपले कर्तव्य आहे, त्यामुळे ते चालविणे गरजेचे आहे, ते शासनाकडे किंवा कोणत्या प्रायव्हेट संस्थेकडे वर्ग करावे ही जी चर्चा चालू आहे ती बंद करावी. रूग्णालय आपणच चालवावे पण जे महाविद्यालय आहे ते कुणाला प्रायव्हेट संस्थेला किंवा राज्यसरकारकडे द्यावे. महाविद्यालय चालविणे हे आपले कर्तव्य नाही, आपले महापालिकेचे काम नाही. रूग्णालय चालविणे हे आपले काम आहे, महाविद्यालय चालविणे आपले काम आहे, त्यामुळे बाकीच्या ज्या संस्था आहेत, जे आपण हत्ती पोसतो आहे, ते सांभाळणे त्यांचे संवर्धन करणे, त्यांना आपण कर्तव्य समजावे आणि महाविद्यालय कोणत्या संस्थेला दिले त्या माध्यमातून आपल्याला जे काही उत्पन्न येईल तो तोटा आपण रूग्णालयात भरून काढू शकतो. आज आपल्याकडे कित्येक इस्टेट डिपार्मेंटकडे १८२ अशा आपल्याकडे मिळकती आहेत, प्रॉपर्टीज् आहेत. त्याच्या उत्पन्नाचा कुठेच उल्लेख केला जात नाही. उदा लोढा पॅरेडाईजमध्ये आपले २५ गाळे आहेत, ते कित्येक वर्षे बंद आहेत, ते भाड्याने देत नाही किंवा विकूनही टाकत नाही. अशा प्रॉपर्टीज् आहेत त्या बंद अवस्थेत आहेत, म्हणजेच उपमहापौरांच्या वॉर्डमध्ये दोन तीन वर्षापूर्वी एक मार्केट उभे आहे, चुकत असेल तर साहेब सांगा तुम्ही, ते अद्यापही बंद आहे, त्यातून उत्पन्न काहीच होत नाही. तर अशा बऱ्याच प्रॉपर्टी आहेत की यातून आपल्याला उत्पन्न मिळू शकेल. मगाशी संजय घाडीगांवकरांनी आपल्या भाषणामध्ये याचा उल्लेख केला. तर अशा प्रॉपर्टीजमधून आपल्याला उत्पन्न मिळत असेल तर त्याचा नक्कीच शोध घेवून त्यावर साधकबाधक चर्चा करून कोणीतरी अधिकारी नेमून आपल्याला यातून उत्पन्न वाढू शकते. १८२ प्रॉपर्टीजची माझ्याकडे लिस्ट आहे, यामध्ये किती बंद आहेत. त्याचप्रमाणे आपल्याकडे काही भूखंड आहेत, त्याच्यामध्ये शैक्षणिक भूखंड येतील. काही हॉस्पिटलचे आहेत, क्रीडांगणचे आहेत, तर काही इतर सुविधा भूखंड आहेत, हे भूखंड बीओटी तत्वावर आपण कोणाला वापरायला देतो त्याला त्यातूनही उत्पन्न वाढू शकते. आता हे जमेच्या बाजूचे झाले. बाकीच्या बऱ्याच सदस्यांच्या डोक्यातून उत्पन्न वाढीच्या कल्पना येतील. पण या तरी अर्थसंकल्पामध्ये मी विरोधी पक्ष नेते किंवा आमचे जे ज्येष्ठ नगरसेवक आहेत त्यांना विनंती करेन की, तुम्ही त्याचा पाठपुरावा करून ज्या ज्या सदस्यांनी सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा येणाऱ्या आगामी वर्षामध्ये पाठपुरावा करून त्या

इम्प्लिमेंट कशा होतील त्यावर लक्ष द्यावे. जेणेकरून प्रत्येक नगरसेवकाला वाटेल की मी केलेली सूचना अंमलात आलेली आहे. त्यामुळे जे पुढच्यावेळेला या उपस्थितीमध्ये नक्कीच वाढ होईल.

आताच आपण मालमत्ता करावर जे बोललो, मालमत्ता कराबद्दल आयुक्त साहेब, आपल्याकडे शीळ दिवा आणि शिळ प्रभागातील सर्वेक्षण वगळता महानगरपालिकेतील सर्व प्रभागामध्ये सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. तर शीळ आणि दिवा याच भागामध्ये का झालेले नाही. कारण आपल्याला येथे दिलेले नाही. या प्रभागांवर आपण करोडो रूपये खर्च करत आहोत. सुविधा पुरवितो आहे. काही अपुऱ्या असतील तरी ह्याच प्रभागाचे सर्वेक्षण का झालेले नाही. मालमत्ताधारकांना स्वतंत्र बिले देण्यासाठी ५० टक्के सभासदांनी अर्ज केल्यास स्वतंत्र बिले देण्यात येतील असे म्हटले आहे. आपण जर करमूल्यांच्या १ टक्का रक्कम प्रशासकीय शुल्क घेणार आहोत तर मग एका सभासदाने जरी अर्ज केला तरी त्याला स्वतंत्र बिल देण्यास काय हरकत आहे. तसेच मालमत्ता कराची बिले टपाल कार्यालयातून पाठविण्याचे प्रस्तावित केले आहे, याला माझा सक्त विरोध आहे, आणि असे करूही नये अशी विनंती आहे. कारण पोस्टाच्या नियमाप्रमाणे टपाल हे तळमजल्यावर पोहचविण्याचा नियम आहे. एकतर त्यात टपाल पेटीत टाकावे किंवा त्या वॉचमनकडे द्यावे किंवा त्यांच्या सुरक्षारक्षकाकडे द्यावे. पाण्याचे किंवा प्रॉपर्टीचे बिल ते त्या ग्राहकांपर्यंत पोहचेल याची गॅरेन्टी नाही. आताची जी पध्दत आहे, त्यात आपण स्वाक्षरी घेतो, त्यामुळे आपल्याला ते कारण राहणार नाही. कुरियरने पण मिळणार नाही. आपली जी जुनी पध्दत आहे ती सुध्दा चांगली आहे पण टपालामार्गे जी प्रस्तावित केली आहे ती पध्दत करू नये अशी माझी तुम्हाला विनंती आहे. खर्च होईल पण त्यातून भरणा होणार नाही. आणि आपण दुसरा भाड्यावर कर लावण्याचा जो प्रस्ताव आहे त्याबद्दल मी मागे एकदा बोललो होतो. कारण ज्या प्रॉपर्टी आहे, जो गाळा असेल किंवा घर असेल किंवा एखाद्याचा रिटायर लोक सुध्दा आपली वास्तू रिटायरमेंट पूर्ण पुंजी लावून एखादा घर घेतो किंवा एखादे दुकान घेतो आणि त्याच्यावर आपण जो ३० टक्के कर लावतो आहे, तो करसुध्दा अन्यायकारक आहे. कारण ते उत्पन्नाचे साधनसुध्दा काही कुटुंबाचे आहे. जर तो मनुष्य त्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स भरत असेल, बाकी कॉर्पोरेशनचे टॅक्स भरतो आहे तो, कमर्शियल असेल तर कमर्शियल टॅक्स भरतो आहे. रेसीडेन्शियल असेल तर रेसिडेन्शियल टॅक्स भरतो आहे. सोसायटीचा मेंटेनन्स भरतो आहे अशा पध्दतीने त्याच्यावर टॅक्सचा आणखी ३० टक्के प्रॉपर्टीवर त्याच्या भाड्याच्या करारापोटी, ३० टक्क्याच्या उत्पन्न करासह ते खरेच अन्यायकारक आहे. कारण काही कुटुंबातील जे सिनीयर सिटीजन आहेत त्यांना ते उत्पन्नाचे साधन आहे. त्याच्यावर आपण सहानुभूतीपूर्वक विचार करायला पाहिजे. उत्पन्नात घट होईल, उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने अशा लोकांवर अन्याय होत असेल तर खरंच त्याच्यावर सहानूभूतीपूर्वक विचार करावा. महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी जर आपण विचार करत असू तर अशा पध्दतीने कर लावत असणार, तर त्याच्यावर विचार करावा आणि अशा काही मालमत्ता आपल्याकडे आहेत का? हजारो चाळी, झोपडपट्ट्या आहे त्यांच्यावर टॅक्स हा लावलेलाच नाही. ते प्रतीक्षेत आहेत की आमच्याकडून टॅक्स घ्या. महापालिकेचे अधिकारी- कर्मचारी त्यांना कर लावण्यात दिरंगाई करत आहे. दिरंगाई करण्यास सुध्दा पैसे घेतात असा माझा स्पष्ट आरोप आहे. काहीना कर लावणेची इच्छा असून त्यांच्याकडून कर घेतले जात नाही. अशा काही झोपडपट्ट्या आहेत. बिल्डिंगस् माझ्या प्रभागात आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत आहेत. त्यांना आपण सार्वजनिक सर्व सोयी देतो. ते बाथरूम वापरतात, घंटागाडीची सुविधा घेतात. दिवाबत्ती देतो, रस्ते ते वापरत आहेत, अशा लोकांकडून कर आकारला जात नाही. ते लोक कर भरायला तयार आहेत, अनधिकृत तर अनधिकृत पण कर जमा करा. नुसतचं एलबीटीच्या नावाने एकाच गाईचे दूध काढण्यापेक्षा आपण इतरही काही उपाय आहेत ते योजा आणि त्या लोकांची इच्छा असताना त्यांची वसुली केली जात नाही याला जबाबदार कोण? तर अशा लोकांकडूनही कराची वसुली करावी अशी माझी सूचना आहे. तसेच आपल्याकडे खोदकाम वगैरे केले जाते. एमएसईबी किंवा इतर तत्सम संस्था आहेत, एमटीएनएल असू द्या, रिलायन्स असू द्या या सगळ्याकडून आपले दीडपट ते दोनपट आपण त्यांच्याकडे भरणा करून घेतो. परंतु गेले सहा-सहा सात-सात महिने त्यांनी खोदल्यानंतर महानगरपालिका ते रस्ते किंवा ते जनपथ ते फूटपाथ त्यांचे रिपेअरींग करत नाही. त्याच्यासाठीसुध्दा आपल्या प्रभागसमितीमध्ये कार्यकारी अभियंता, किंवा

ज्युनिअर इंजिनीअर हे लोक कारणे सांगतात, की आत एलबीटीमुळे पैसा येत नाही. परंतु एलबीटी आणि या विषयांचा संबंध काय येतो. ज्यावेळेला ज्या संस्थेने तुमच्याकडे दीडपटीने पैसे भरलेत रक्कम भरलेली आहे, अनामत रक्कम भरलेली आहे, तर अशी अनामत रक्कम भरली असतानाही या कामाला दिरंगाई का होते हे चर का बुजविले जात नाहीत. आजही आमच्या घोडबंदर पट्टयाकडे एमएसईबीने सगळेच रस्ते खोदलेले आहेत, फूटपाथ खोदलेले आहेत त्या लोकांनी आपल्याकडे अनामत रक्कम भरलेली असतानाही, गेले तीन ते चार महिने आता पावसाळा चालू आहेत, ते खड्डे जसेच्या तसे आहेत. याच्यावर महापालिकेचा खर्च होणार नाही. आपल्याकडे असलेली रक्कम आपल्याला कॉन्ट्रॅक्टरला द्यायची आहे, मग त्याला तर उशीर का होतो आहे. जिथे आपल्याकडे निधी नाही तो निधी नसल्याकारणाने जी कामे होणार नाही त्याबद्दल आम्ही लोकांना समजावून सांगू शकतो. पण असलेल्या रकमेतून आपल्याकडे जी अनामत रक्कम भरलेली आहे, त्यातून ही कामे का होत नाही याचाही विचार प्रशासनाने करावा. घोडबंदररोडमध्ये शॉपिंगसेंटरसाठी काही सुविधा भूखंड आहेत. मागच्यावेळेला मी महासभेत सांगितले होते की घोडबंदर पट्टयामध्ये मॉल आणि शॉपिंग सेंटर भरपूर झालेले आहेत. तर याचे मंडयामध्ये कन्व्हर्ट करावे कारण मंडयाची गरज आहे. आज घोडबंदर, ब्रह्मांड पट्टयामध्ये फिरलात तर परत या फेरीवाल्यांनी संपूर्ण आपले नवीन रस्ते व्यापलेले आहेत, जुन्या ठाण्याची परिस्थितीच नवीन ठाण्यामध्ये होईल. ते उपनगरांमध्ये होईल तर यासाठी आपल्याला मंडईची गरज आहे, त्या मंडईमध्ये फूलमार्केट असू द्या. भाजी मंडई असू द्या, फळमार्केट असू द्या मच्छीमार्केट असू द्या, अशा या शॉपिंग सेंटरपेक्षा आम्ही तेथे मंडईची गरजे आहे. त्यामुळे फेरीवाला धोरण याच्यावर आता मी पेपरमध्ये वाचले आणि चौकशी केली त्यांच्याकडे फॉर्म भरण्याचा रिस्पॉन्स चांगल्या पध्दतीने मिळालेला नाही.आणि या लोकांवर ज्यावेळेला आपण कारवाई करतो त्यावेळेला आपल्याच काही राजकीय लोकांचा दबाव येतो आणि अधिकाऱ्यांवर दबाव आल्यामुळे फेरीवाले काही जात नाहीत आणि लोकांना याचा त्रास होतो आहे. त्यामुळे माझी सूचना आहे शॉपिंग सेंटरसाठी सुविधा भूखंड असतील त्याचा मंडईमध्ये समावेश करावा आणि तिथे मंडयाची सुविधा द्यावी. स्मशानभूमीसाठी जे आहे, आता नरेश मणेरासाहेबांनी त्यांचा उल्लेख केला. स्मशानभूमींची अवस्था फार बिकट आहे. मागच्याच महासभेत ३५९ लोकांची भरती, सुरक्षारक्षकांची बोर्डातर्फे करावी असा प्रस्ताव आपल्याकडे आलाआहे. त्यामुध्ये हेच दिले होते की, हे सुरक्षा रक्षक कुठे कुठे काम करणार आहेत. त्याच्यामध्ये दिले होते की, महानगरपालिकेच्या सर्व वास्तूंमध्ये. महानगरपालिकेचे हेड ऑफिस असू द्या, प्रभागसमित्या असू द्या, क्रीडागंणे, मैदान, मंडया, स्मशानभूमी येथे सर्व सुरक्षारक्षक आहे, मी तुम्हाला निदर्शनास आणतो की मला कोणत्याही मैदानात सुरक्षारक्षक दिसलेला नाही. कोणत्याही स्मशानात सुरक्षा रक्षक नाही. कित्येक स्मशानभूमी आज फोन केला की जाळू शकतो तिथे, अशी परिस्थिती तिथे आहे. कोणतीही नोंदवही नाही सुरक्षारक्षक नाही आहे. कुणीही प्रेत आणावे आणि जाळावे अशी परिस्थिती महानगरपालिकेच्या स्मशानभूमीमध्ये आहे. मग हे ३५९ सुरक्षा रक्षक भरणार आहोत ते नक्की तिथे लावणार आहात का? आजही माझ्या प्रभागामध्ये आमदारनिधीतून १ करोड रूपये नाना नानी पार्क आणि मैदानासाठी मा.डावखरे साहेबांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. पण हा निधी वापरल्यानंतर तिथे सुरक्षा रक्षक महापालिका देईल का? जर तो सुरक्षा रक्षक मिळाला नाही तर त्या पैशाचा अपव्यय आहे. सहा महिन्यांमध्ये त्या मैदानाची वाट लागते. मग अशा मैदानांवर आपण खर्च करायचा का? हा निधी वाया आहे, शेवटी हा लोकांचाच पैसा आहे. कोणत्याही आमदारांचा निधी असू द्या कोणाचाही निधी असू द्या पण हा लोकांचा पैसा आहे. सहा महिन्यात त्या मैदानाचे हाल परत तसेच होणार असतील तर मग आपले उद्यान विभाग काय करते? आपली सिक्युरिटी काय करते. महापालिकेने येथून पुढे जे आपले ३६० लोक बोर्डातून भरणार आहोत ते प्रत्येक मैदानाचं संरक्षण करण्यासाठी, स्मशानभूमीच्या नोंदवही आणि त्यांची सुरक्षा करण्यासाठी नेमावेत.

घोडबंदररोडवर पादचारी पुल आत्यंतिक गरजे आहे. आपल्याकडे आता घोडबंदर रोड कापूरबावडी, माजिवड्याचा ब्रिज झाला तर तुफान वेगाने गाड्या जातील. पण असे काही स्पॉट आहेत की मानपाडा नाका येथे शाळा आहे. त्या शाळेच्या येथे पादचारी पुलाची फार गरज आहे. ब्रह्मांड नाक्यावरही पादचारी पुलाची गरज आहे. विजय गार्डन नाक्यावर, पातलीपाड्याच्या नाक्यावर या वर्षभरात ८ अपघात होवून मृत्यू झाले आहेत. त्याची पोलीसाकडे नोंद आहे. तर त्या रस्त्यांवर स्पीडब्रेकर देवू शकत नाही.

सिग्नल लावू शकत नाही. कारण जर आता पूल बांधले तिथे सिग्नल लावले हे ही चुकीचे आहे. पण इथे पादचारी पुलांची फार निकड आहे, ते फूटवॉर वर म्हणजे फार आत्यंतिक लवकरात लवकर व्हावे याची गरज आहे. त्यामुळे अशा पध्दतीने अर्थसंकल्पावर मी सकाळपासून बरंच काही बोलण्यासाठी आलो होतो पण उत्पन्नाच्या बाजूवर बोलायला हवे अशी माझी भावना आहे. मी जे दिलेले जे दोन तीन उपाय आहे, याच्यावर विचार करावा अशी माझी विनंती आहे. आताची जी उपस्थिती आहे ती वाढेल तर याचे वाढण्याचे कारण तुम्ही या वर्षामध्ये आम्ही ज्या थोड्या लोकांनी सूचना केलेल्या आहेत, प्रस्ताव दिलेले आहेत, त्याचे इम्प्लिमेंट आहे हीच माझी भावना आहे, मी एवढे दोन शब्द बोलतो, अर्थसंकल्पावर मला बोलण्याची संधी दिलीत महापौर साहेब तुमचे खरंच धन्यवाद !
जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्रीमती रेखाताई इंदिसे :-**

मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते आणि सर्व उपस्थित सदस्य.

मा.महापौर महोदय, ठाणे महानगपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक सभागृहामध्ये मांडले आहे. मा.आयुक्तांनी या अनेक चांगल्या आणि नव्या गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. त्याबाबत ठाणेकरांच्यावतीने त्यांचे आभार मानते. हे अंदाजपत्रक निश्चित चांगले आहे. तरी हे अंदाजपत्रक मंजूर करताना काही सूचनांचा उहापोह करण्याचा माझा मानस आहे. मा.आयुक्त महोदय आज ठाणे शहरासमोर अनेक समस्यांची जंत्री आहे, ही जंत्री दूर करण्याचा आपण आटोकाट प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आयुक्तांसह संपूर्ण प्रशासनाचे कौतुक केले पाहिजे.

महापौर महोदय, आगामी अर्थसंकल्प मंजूर करताना काही जुन्या गोष्टींचा आणि जुन्या योजनांचा विसर पडू देवू नये ही माफक अपेक्षा आहे. सध्या पावसाळा सुरू झाला आहे, त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडण्याचे प्रमाण वाढणार आहे याची दखल घेवून आगामी काळात रस्ते बांधताना ते अधिक मजबूत कसे होतील याचा विचार केला पाहिजे. रस्ते कोणत्याही पध्दतीने बांधले गेले तरी ठेकेदारांकडून ते कसे मजबूत बांधले जातील, यावर आधुनिक तंत्राने लक्ष ठेवले पाहिजे. विकसित देशांमध्ये तशी तजवीज करण्यात आली आहे. तोच प्रकार येथे वापरला तर सुरूवातीच्या काळात खर्च अधिक होणार असला तरी भावी काळात खर्च मात्र वाचणार आहे. तातडीच्या रस्त्यांना मंजुरी दिली जात असताना अनेकदा जुन्या रस्त्यांच्या कामाचा बळी दिला जात असतो असा प्रकार होऊ नये. जे जुने रस्ते आधीच मंजूर करण्यात आले आहेत, ती कामे रद्द करू नये, पदाधिकाऱ्यांशी सदस्यांशी विचारविनिमय केलयाशिवाय हे रद्द करू नये. रस्त्यांचे रूंदीकरण, उड्डाणपूल आदी कामांना प्रशासनाने मंजूरी दिली आहे. कॅडबरी जंक्शन ते शिवाईनगर हे त्याचे चांगले उदहारण आहे. मात्र अशा विकासामध्ये जे लोक बाधीत होत असतील त्यांना त्याच्या भागात एसआरडी, राजीव आवाससारख्या योजनांमध्ये सामावून घ्यावे. जेणेकरून नागरिकांचाही विरोध होणार नाही. दोध इंदिसे चौक ते झेलाबाई इंदिसे चौक या रस्त्यांच्या रूंदीकरणाची नितांत गरज आहे. त्यामुळे या रस्त्याच्या रूंदीकरणासाठी प्रशासनाने २५ लाखाची तरतूद करावी. प्रशासन आणि सदस्यांनी जर परस्पर सहकार्याने कामे केली तर या शहराचा विकास व्हायला वेळ लागणार नाही.

मा. महापौर महोदय, शहरातील उद्यानांची कामे अनेक दिवसांपासून रेंगाळलेली आहेत. ही रेंगाळलेली कामे तत्काळ मार्गी लावावीत. मुल्ला बाग येथील पालिकेच्या मालकीच्या उद्यनाचा नवी मुंबईच्या सेव्हन वंडर्स धर्तीवर विकास करण्यात यावा. जेणेकरून मुंबईसह जिल्ह्याच्या अनेक भागातील लोक ठाण्यात पर्यटनासाठी येतील. त्यातून पालिकेचे उत्पन्न वाढीस लागेल. सध्या पालिकेची अर्थव्यवस्था डबघाईस आली असल्याची चर्चा आहे. त्यामुळे उद्याने हे देखील उत्पन्नवाढीसाठी चांगले माध्यम ठरू शकते. ठाणे परिवहन सेवा वादग्रस्त ठरलेली आहे. सध्या टीएमटीची अवस्था अत्यंत वाईट आहे. निधीअभावी टीएमटी बंद पडण्याची वेळ आली आहे. प्रत्येकवेळी पालिकेच्या जॅकवर टीएमटीला उभी

करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे पालिकेने आत टीएमटी स्वयंपूर्ण कशी होईल, याचा विचार केला पाहिजे. ठाणे शहराच्या आजूबाजूला अनेक पर्यटनस्थळे आहेत. अनेक खासगी संस्थे ज्याप्रमाणे मुंबई दर्शन आयोजित करून आपला व्यवसाय करीत असतात. त्याच पध्दतीने ठाणे शहरातील अनेक ऐतिहासिक स्थळांचे तसेच, निसर्गरम्य स्थळांचे दर्शन घडविण्यासाठी ठाणे दर्शन पध्दतीची आठवड्याला फेऱ्या सुरू कराव्यात. त्यासाठी ठाण्यातील पर्यटनस्थळांचा विकासही करावा त्यामधून पालिकेला चांगले उत्पन्न मिळू शकते.

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने अनेक रूग्णालये चालविली जातात. या रूग्णालयांची अवस्था फारशीच चांगली नाही. माझ्या प्रभागातील आनंदीबाई जोशी या रूग्णालयाचीही अवस्था फारशी चांगली नाही. १९८६ साली ही इमारत उभारण्यात आली आहे. त्यामुळे आता ही इमारत काही प्रमाणात जर्जर झाली आहे. याचाचा विचार करून सदर इमारतीची पुन:र्बांधणी करण्यात यावी. नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अशा सुविधा देण्यात याव्यात. त्यासाठी किमान २५ लाख रूपयांची तरतूद करण्यात यावी. तसेच, खासगी पातळीवर ज्या प्रमाणे सोनोग्राफी किंवा एक्स-रे काढले जातात. त्याच पध्दतीने खासगी रूग्णालयातून येणाऱ्या रूग्णांना या सुविधा दरामध्ये सवलत देऊन सुरू केल्यास त्यातून पालिकेलाही उत्पन्न मिळू शकते. आजमितीला ठाणे शहरामध्ये अशी अनेक सोनोग्राफी आणि एक्स-रे सेंटर्स आहेत. त्यामध्ये किमान १ हजार ते कमाल लाखो रूपयांमध्ये या तपासण्या केल्या जातात. जर पालिकेने हिच सुविधा माफक दरात उपलब्ध करून दिल्यास त्याचा नागरिकांना लाभ तर होईलच शिवाय पालिकेच्या तिजोरीमध्येही गंगाजळी निर्माण होईल.

मा. महापौर महोदय, शहरातील घनकचऱ्याची समस्या तेवढीच तीव्र आहे. सध्या गल्ली-बोळामध्ये साफसफाई व्यवस्थित होत नाही. त्यासाठी छोट्या गाड्यांची गरज आहे. जर ठामपाने छोट्या गाड्या खरेदी केल्या तर गल्लीबोळामध्ये जाऊन साफसफाई व्यवस्थित करू शकतात. नागरीक रोगराईपासून मुक्त होवू शकतात. ही बाब ध्यानात घेऊन पालिकेने लहानमोठ्या साफसफाई वाहनांची खरेदी करावी. त्यासाठी पालिकेने १ कोटी ८० लाखांची विशेष तरतूद करावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरामध्ये बेकायदा होर्डीगबाजी करण्यास मनाई करण्यात आली आहे. तरीही, अशी होर्डिंगबाजी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. असे होर्डीग लावणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई देखील केली जात नाही. त्यामुळे कायदेशीर बाबी पडताळून असे होर्डिंग हुडकावण्यासाठी विशेष पथक गठीत करून संबंधितांना समज अथवा नोटीस न बजावता थेट दंडात्मक कारवाई केल्यास दोन गोष्टी साध्य होवू शकतात. एक तर शहराचे विद्रुपीकरण रोखले जाईल तसेच, पालिकेचे उत्पन्न वाढीस लागेल.

मा. महापौर महोदय, गेल्या अनेक वर्षाचा इतिहास पाहिल्यास दरवर्षी मागासर्गीय निधीचा योग्य विनियोग केला जात नाही. वस्तुस्थिती पाहिल्यास देण्यात येणारा निधीच अत्यल्प स्वरूपात असतो. मागासवर्गीय लोक साधारणपणे झोपडपट्टयांमध्ये वास्तव्यास आहेत. त्यांचे राहणीमान अत्यंत खालच्या स्तरावर असते. त्यामुळे त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी हा निधी योग्य पध्दतीने वापरलाच गेला पाहिजे. त्यासाठी कोणत्याही पध्दतीची हयगय केली जाऊ नये . महापौर महोदय, मागासवर्गीय निधीच्या अनुषंगाने केवळ २० ते २५ लाखांची तरतूद करण्यात येत असते. त्यातही अनेकदा हा निधी इतरत्र वळविण्यात येत असतो. त्यामुळे या निधीमध्ये ४० ते ४५ लाखांनी वाढ केली तर, झोपडपट्टयांचा विकास करणे अत्यंत सुकर होऊ शकते. तसेच, निधीच्या वापरातून मागासवर्गीय समाजघटकांचे जीवनमान सुधारू शकते.

मा. महापौर, आयुक्तसाहेब, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते आणि सर्व उपस्थित सदस्यांनी माझ्या या सूचनांचा गांभीर्याने विचार करून सदरचे अंदाजपत्रक मंजूर केल्यास शहराच्या विकासाला ते पूरक ठरू शकते, असा माझ्या विश्वास आहे. तरी या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा ही विनंती.

धन्यवाद !

जयभीम, जयभारत, जयमहाराष्ट्र!

**श्री. मनोज शिंदे :**

महापौर महोदय, सभागृहात सर्व सदस्य पोटतिडकीने आपल्या सूचना मांडत आहेत, मागे एकही अधिकार नाही. नियमाप्रमाणे बजेटच्यावेळी प्रमुख खात्यांचे अधिकारी असावेत.

**श्रीमती विशांखा खताळ :**

मा. महापौर महोदय, सन २०१४-१५ चा काही कडू गोड असा अर्थसंकल्प महासभेपुढे मंजुरीसाठी आला आहे. मा. महापौर, मा. आयुक्त, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेते तसेच सर्व नगरसेवक नगरसेविका. तसेच अर्थसंकल्प तयार करण्याकरिता ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली त्यांचे अभिनंदन.

शहरातील उद्योग व नागरिकांवर कराचा बोजा न टाकता महानगरपालिकेचा रेव्हेन्यू कसा वाढविता येईल, याकडे लक्ष देण्यासाठी खालील मुद्दे विचारात घेतल्यास महापालिकेला अतिरिक्त निधी मिळू शकेल.

ठाणे शहर हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे दिल्ली येथील प्रगती मैदानाच्या धर्तीवर सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेले मोठे प्रदर्शन केंद्र उभारावे, ज्यात पंचतारांकित हॉटेल्स, राहण्याची सुविधा, सेमीनार आणि कॉन्फरन्ससाठी भव्य हॉल, वेगवेगळी छोटी मोठी प्रदर्शन केंद्रे एक्झिबीशन केंद्र ज्यात औद्योगिक आणि ग्राहकोपयोगी वस्तूंचे प्रदर्शने इत्यादी भरवता येऊ शकेल. त्यातून महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होईल. त्यातून महापालिकेला उत्पन्न मिळेल. ठाणे महानगरपालिकेची परिवहन सेवा व्यावसायिकरित्या चालविल्यास परिवहन सेवेस जो तोटा होतो तो होणार नाही आणि महानगरपालिकेला दरवर्षी जो निधी परिवहन सेवेस द्यावा लागतो तो इतर विकास कामांसाठी वापरता येईल. नवीन नोंदणीकरण कायदा रद्द करणे, ह्या कायद्यामुळे उद्योजक आधीच दुकाने व आस्थापना कायद्याखाली कारखाने अधिनियमाखाली तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे देखील नोंदणीकृत असताना ठाणे महापालिकेच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उद्योजकांकडे जाऊन अनेक प्रकारच्या तपासण्या करण्यासाठी आग्रह धरतात. हे व्यापारी आणि उद्योजकांसाठी अडचणीचे असून आधीच मंदीमुळे अडचणीत असलेल्या उद्योजकांना महापालिकेच्या दुबार नोंदणीकरण कायद्याचा त्रास होतो. जर महापालिकेला ठाणे शहरातील व्यापारी आणि उद्योजकांची सर्व माहिती हवी असल्यास शासनाच्या कामगार उपायुक्त कार्यालय तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे सर्व माहिती उपलब्ध होऊ शकेल.

शहरातील सर्व रस्ते व फूटपाथवरील अनधिकृत व्यवसाय बंद करून त्यांचे पुनर्वसन करावे, जेणेकरून रस्ते वाहतुक तसेच लोकांना मुक्त वावरासाठी उपलब्ध होतील. ठाणे शहरात सुमारे ५२ लघुऔद्योगिक वसाहती आहेत. त्यातील काहींना अजूनही सेवा उद्योगांचा दर्जा असल्यामुळे या वसाहतींमध्ये लघु उद्योग उत्पादक असून देखील त्या वसाहतींना उत्पादकेचा दर्जा मिळालेला नाही. तरी कृपया सदर वसाहतींना मॅन्युफॅक्चरिंगचा दर्जा मिळावा ही विनंती. अनधिकृत होर्डिंग्ज/ बॅनर / जाहिरात फलक यावर कडक कारवाई करावी. सर्व बहुमजली बाजार इमारतींमध्ये लोकांची रेलचेल वाढवण्यासाठी त्याचे परिवर्तन मॉलमध्ये किंवा विशिष्ट वस्तू इलेक्ट्रॉनिक्स बाजारमध्ये करावे. आता बरेच मॉल आहेत, प्लाझा वगैरे उभारताना ते आकर्षित असायला पाहिजेत, जेणेकरून ग्राहक तेथे आकर्षित होतील. गांवदेवीला सुध्दा मार्केट बांधलेले आहे. पण तिथे मार्केटमध्ये दुसऱ्या तिसऱ्या माळ्यांपर्यंत कोणी जाणार आहे का?त्यासाठी तेथे इलेक्ट्रॉनिक्स, मनीष मार्केटच्या धर्तीवर मार्केट असावे, जेणेकरून सर्व स्वस्त वस्तू तेथे मिळतील. त्यामुळे लोक तेथे येवू शकतील, त्याच्यामुळेही महापालिकेला उत्पन्न मिळू शकेल.

सन २०१३ मध्ये स्थानिक संस्था कर चालू केला. काही महिने व्यापारांनी असहकार केल्यामुळे महापालिकेची आर्थिक कोंडी झाली होती. स्थानिक संस्था कर महापालिकेच्या उत्पन्नाचे स्तोत्र आहे. आतापर्यंत ४७५ कोटींची वसुली झालेली आहे. स्थानिक संस्था कराद्वारे उत्पन्न वाढकरिता आपण ज्या

उपाययोजना करीत आहात त्या कठोरपणे अंमलात आणाव्यात. मालमत्ता कर सर्व प्रभाग समित्यांकडून कर वसुली जास्त प्रमाणात येणे आवश्यक आहे. मुंब्रा प्रभाग समितीअंतर्गत कर वसुली कमी आहे. तेथे नागरिकांमध्ये जनजागृती करून मालमत्ताकर भरण्यास प्रवृत्त करावे. भांडवली मूल्यधारित करप्रणालीला यापूर्वी महासभेने विरोध केलेला आहे. या कर प्रणालीबाबत सर्वांना बरोबर घेवून मालमत्ता करधारकांवर अन्याय होणार नाही असे उपाय योजावेत जे मालमत्ताकरधारक थकबाकीदार असेल अशांविरूध्द कठोर कारवाई करावी. जेणेकरून मोठ्या प्रमाणात वसुली होईल.

पाणी पुरवठ्याबाबत अनेक ठिकाणी होत असलेली गळती थांबविणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी व्हॉल्व्हमधून गळती चालू आहे. मीटरप्रमाणे पाणीपुरवठा करण्याचे आपण ठरविले आहे. परंतु सदर योजना प्रभावीप्रणे व काटेकोरपणे राबविली पाहिजे. पाणीपुरवठ्याची बिले मालमत्ताकरांच्या बिलामध्ये समाविष्ट करून दिल्यास वसुली अधिक होवून उत्पन्नात भर पडेल. या माझ्या सूचनेचा अवश्य विचार करावा.

यूटीडब्ल्यूटी रस्ते बनविताना अतिआवश्यक रस्त्यांनाच प्राधान्य द्यावे. प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागात यूटीडब्ल्यू रस्ते बनवून समान न्याय द्यावा. आपण महासभेत पार्किंग धोरणाचे ठराव करतो. त्याची अंमलबजावणी त्वरीत झाल्यास मनापाच्या उत्पन्नात भर पडेल.

नवीन शाळेच्या इमारतींना मंजुरी देताना जुन्या शाळांच्या समस्यांबाबत विचार होणे आवश्यक आहे. मनपाच्या शाळांमध्ये पाणी, बेंचेस स्वच्छता, विद्यार्थ्यांचे आरोग्य इ. बाबींवर लक्ष दुर्लक्ष होते. तेथे लक्ष देणे आवश्यक आहे. मराठी शाळांमध्ये पट वाढविणे गरजेचे आहे. मराठी शाळांप्रमाणे इंगजी माध्यमाच्या शाळेला या सर्व सुविधा दिल्या पाहिजेत. महापौर महोदय, इंग्रजी शाळांच्या मुलांकडून आपण फी घेतो पण त्यांना कुठली सुविधा देत नाही आपल्या ठाणे महापालिकेच्या शाळेत. हे मी शिक्षणमंडळा प्रश्न विचारले तर त्याचे उत्तर मला अजून दिलेले नाही.

ठाणे शहर तलावांच शहर म्हणून प्रसिध्द आहे. पंरतु सध्या अनेक तलावांची अवस्था अत्यंत बिकट आहे. तलावांचे सुशोभिकरण करून बोटींगची व्यवस्था केल्यास महापालिकेला उत्पन्न मिळू शकेल. शहरातील उद्यानाची निगा राखण्याकरिता प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागातील उद्यानाकरिता निधी देणे आवश्यक आहे. अनेक उद्यांनाचे नाव मोठे आणि लक्षण खोटे अशी अवस्था आहे या सूचनेचा विचार करून निधीची तरतूद करावी.

घनकचरा : शहरातील स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छतेचा उपद्रव करणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याचे ठरविले आहे. याबरोबरच शहरातील हजेरी पेटीवरील कर्मचाऱ्यांबाबत ठोस उपाय योजना करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष हजेरीपेटीवरील कर्मचाऱ्यांची संख्या व दररोज हजर व गैरहजर राहणारे यांची चौकशी होणे आवश्यक आहे. सतत गैरहजर राहणाऱ्यांची चौकशी करावी व त्याला पाठीशी घालणाऱ्या सॅनिटरी इन्स्पेक्टरवर कारवाई करावी. किसननगर हजेरी पेटीवर हजेरी बुकावर अजूनही मयत कर्मचाऱ्यांची नोंद आहे. अशा अंदाधुंदी कारभारामुळे प्रभागात स्वच्छतेचा अभाव जाणवत आहे. तसेच प्रभागात लहान घंटागाड्या उपलब्ध करून दिल्यास कचरा जमा करणे सोपे जाईल या माझ्या सूचनेचा अवश्य विचार करावा.

आपण राष्ट्रीय नागरी आरोग्य कार्यक्रमातंर्गत ५० हजार लोकसंख्येकरिता १ आरोग्य केंद्र निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु सध्या येथे आरोग्यकेंद्रआहे, त्याच्या जवळपास जागा स्ट्रक्चर उपलब्ध असल्यास डिजीटल एक्स-रे मशीन व लॅब सारखे उपक्रम केल्यास नागरिकांना त्याचा फायदा होऊन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. या सूचनेचा राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात समावेश करावा.

समाजकल्याण : प्रभागसमिती निहाय बचतगटांच्या विकास संस्था तयार करून महिला बाजार केंद ही संकल्पना अतिशय योग्य आहे. दारिद्र्य रेषेखालील महिलांना देण्यात येणाऱ्या अनुदानात सुधारण करून अनुदान वेळेवर द्यावे. अपंगाकरिता कल्याणकारी योजनेद्वारा मतिमंद, अंध निसमर्थ व्यक्तींना उदरनिर्वाहाकरिता १५०० रू. अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेचे स्वागत करून ही योजना परिपूर्ण कशी होईल याकडे लक्ष द्यावे.

मागासवर्गीय निधी महापालिकेच्या उत्पन्नातून ५ टक्के ठेवला जातो त्याचा विनियोग वेळेत व्हावा.

परिवहन सेवेचे जे.एन.एम.एम.यू अंतर्गत २३० बसेस व पायाभूत सुविधांकरिता १४० कोटी निधी मंजूर झाला आहे. बसखरेदी करताना मिनी बसचा अवश्य विचार व्हावा. अनेक ठिकाणी मिनी बसची अत्यंत आवश्यकता आहे. उदा. किसननगर ते ठाणे स्टेशन शाळेच्या वेळेत मिनी बस चालू केल्यास उत्पन्न वाढू शकेल. परिवहन सेवेकरिता अनुभवी अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. अनेक बसथांब्यावर येणाऱ्या व जाणाऱ्या बसेसच्या वेळापत्रकाचा अभाव आहे. बसथांबे सुव्यवस्थित करावे. महिला प्रवाशांकरिता ५ टक्के बसेस राखीव ठेवण्याचे तसेच टप्प्याटप्प्याने महिला बसमध्ये वाढ करण्याचे धोरण अतिशय चांगले आहे.

आस्थापनाविषयक सुधारणा : प्रशासन मनपात रिक्त झालेल्या पदांची भरती ऑनलाईन व तिमाही करण्याचे नियोजित आहे. सदर धोरण चांगले असून भविष्यात महापालिकेत विविध पदांची आवश्यकता भासणार आहे. सध्या ही कर्मचाऱ्यांची कमतरता आहेच. तरी धोरणाची त्वरीत अंमलबजावणी केल्यास भविष्यात प्रशासनाच्या कामात सुसूत्रता निर्माण होवून कारभार गतीमान होईल.

धन्यवाद !

जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्री. उमेश पाटील :**

मा. महापौरसाहेब, मा. उपमहापौर मा. आयुक्तसाहेब, मा. स्थायी समिती सभापती, मा. विरोधी पक्षनेते, मा.सभागृह नेते सर्व नगरसेवक व नगरसेविका, सर्व खातेप्रमुख, पत्रकार बंधु व भगिनींनो आणि प्रतिनिधी.

सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्र २०१४-१५ चे जमा खर्चाचे मूळ अंदाजपत्र आज महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चेसाठी ठेवण्यात आले आहे.

शहरांचे वाढते नागरिकरण, वाढत्या झोपडपट्ट्या यामुळे खर्चात नागरी सुविधावर दिवसेंदिवस वाढ होत आहे व उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून पाहता तूट येत आहे. यामुळे समतोल अर्थसंकल्प राबविणे कठीण झाले आहे. मी या ठिकाणी प्रथम जमेच्या बाबींकडे लक्ष वेधत आहे संकलित करामध्ये २०११ ते २०१४ पर्यंत ८८५२ केटी ९३ लाख रूपये, परंतु येत्या वर्षभरात १२२०० कोटी आयुक्त व स्थायी समितीमध्ये दर्शविले आहे. प्रत्यक्ष जमा होऊ शकेल का कारण त्याचेवळी खर्चाचा मेळ देखील जमेच्या रकमेवर असतो आणि मग सरतेशवेटी वर्षाखेर  वसुली मात्र कमी दिसते आणि यामुळे वर्षभरात बजेटमध्ये दर्शविलेली कामे होत नाहीत अशावेळी अतिहुशार नगरसेवकांच्या कामात प्रत्यक्ष कामे दिसतात. परंतु जो प्रशासनावर अवलंबून असतो त्याची कामे होत नाहीत. त्यामुळे जमेची रक्कम दर्शविताना आवश्यक बाब असते. पानं क्र. ७ वर स्थावर मालमत्ता, शाळा, भाडे २०१२-१३ मध्ये ८० लाख २९ हजार दर्शविले आहे. पानं क्र. ११ वर दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये असलेले व्यायामशाळेचे उत्पन्न कोठेही दर्शविलेले नाही. तसेच पानं.क्र. १३ वर कोंडवाडे अस्तित्वात आहे काय असतील तर कोणत्या भागात आहेत त्याची माहिती द्यावी.

मा. महापौर महोदय, पान क्र. १९ वर शैक्षणिक भूखंड, भाडेकरापासून उत्पन्न कोणकोणते भुखंड शैक्षणिक क्षेत्रासाठी भाड्याने दिले आहे का? नगरपालिकेकडे अनेक भूखंड आज पडुन आहेत असे भुखंड स्थानिक नागरिकांच्या शिक्षण संस्थांना देणे आवश्यक आहे. पानं क्र.२७ वर आपण आमदार निधी अनुदान दर्शविले असताना प्रत्यक्ष मात्र निधी जमा दिसत नाही व भविष्यातही २०१४-१५ करिता

दर्शविलेली नाही. मात्र खासदार निधी अनुदान जमा झालेले आहे. पानं. क्र.३९ वर आपण भुयारी व गटार योजना २०१४-१५ मध्ये केंद्रशासन व राज्यशासन अनुदान दर्शविले नाही. तसेच पानं क्र.४१ वर केंद्रशासन अनुदान, प्रशासन अनुदान २०१३-१४ ५० कोटी दर्शविले होते. प्रत्यक्षात काही रक्कम जमा झालेली नाही. यामध्ये काही त्रुटी होत्या का? पानं नं. १११ वर वृक्षप्राधिकरण विभागाचा झाडे लावणे निगा व देखभाल करणे यावर मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, वृक्षप्राधिकरण समिती स्थापन झालेली मात्र न्यायालयाने ती बरखास्त केली आहे. परंतु मा. आयुक्त साहेब, आपल्याला अधिकार आहेत. ठाणे शहरामध्ये ९ प्रभाग समित्या आहेत, या प्रभागसमित्यांमध्ये ज्या ठिकाणी शाळा, कॉलेजेस् असतील त्या ठिकाणची जी झाडे पडायला आली आहेत ती तोडण्यात यावीत. कारण ६ तारखेला दत्तवाडी येथील पदमावती शाळेजवळ ११.३० वा. एक झाड पडले आणि ती वेळ १२.३० ची असती तर अनेक मुलांना दुखापत झाली असती. त्यामुळे ९ प्रभाग समितीवाईज आपले जे अधिकारी वर्ग असतील, त्यांना आदेश द्यावेत की जी पडणारी झाडे असतील, कारण गुलमोहराची झाडे पडत आहेत. कालच खारेगांवला एक घटना घडली. बुधाजी पाटील जो मार्ग आहे त्या ठिकाणी मरराठी शाळा आहे. सायं. सव्वा पाच वाजता घडली. दोनशे ते अडीचशे फूटाची भिंत असून झाड सुध्दा पडले. अशा अनेक घटना ठाणे शहरात होत असताना याचासुध्दा विचार करून त्यासुध्दा तोडण्यात याव्यात. पानं क्र. ११९ वर शालेय क्रिकेट संघ याविषयी वस्तुस्थिती यासंबंधी मागील वर्षी झालेला खर्च करारपध्दतीने केला गेला व सन २०१४-१५ मध्ये तरतूद का करण्यात आली नाही. पानं १३९ खारेगांवमध्ये आरओबी ब्रिज आहे, याबाबत आम्ही मा. महापौर आयुक्तांशी चर्चा केली होती की, सदर आरओबीमध्ये बदल करणे आवश्यक आहे व त्यामध्ये काही बदल झाले नाहीत. आरओबीचे काम सुरू झाले परंतु कळवा स्टेशन येत असताना खारेगांव व पारसिक नगर यांना त्याचा कोणताही फायदा नाही. त्यात सुधारणा करावी लागेल. महापौर, आयुक्त नगरविकास अधिकारी असतील आपण प्रत्यक्ष येवून त्या ठिकाणी बघा, त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे परिवहन संदर्भात आजच मुंबई सकाळमध्ये बातमी वाचली. ठाणे महानगरपालिका सक्षम झाली पाहिजे, ही ठाणे शहराची आपल्या सर्वांची मागणी आहे. ठाणे शहरात परिवहनच्या एकूण ३१५ बसेस आहेत आणि या ठिकाणी १४० बसेस चालविल्या जातात. १७५ बसेस बंद आहेत. या बसेस का बंद आहेत, याबाबत बातमी आलेली आहे. मला वाटतं त्या ठिकाणी बीएसटीसारखा चांगला अधिकारी नेमला पाहिजे, जसे सोनाराने कान टोचल्यानंतर चांगले काम करतो. महापौर, मा. आयुक्तांचे म्हणणे आहे असेल ही सक्षम झाली पाहिजे, त्यात सुधारणा असल्या पाहिजे. आपण जे स्पेअर पार्ट आणतो, ते कुठून आणले जातात, कुठल्या कंपनीचे आणले जातात याची शहानिशा करत नाही आणि ठाणे शहरामध्ये परिवहन संदर्भात विचार केला तर सगळयाच्या मनात विचार आला पाहिजे. परिवहन कधी सुधारेल, व सुधारली पाहिजे, त्या ठिकाणचा कर्मचारी वर्ग, कुठल्या पध्दतीने कामे करतात हे आपण तपासले पाहिजे. या दृष्टीकोनातून सांगू इच्छितो की, आपण त्यामध्ये आकडेवारी दिली होती. आणि मा. महापौर अर्थसंकल्पाच्या रूपाने अनेक सदस्य आपल्या भागातून मागणी करणार आहेत, सुविधा पुरविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी पाठपुरावा करणार आहेत. मी ही प्रभाग क्र. २१ मध्ये नागरी सुविधांसाठी, त्या अनुषंगाने, जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांविषयी आपले विचार मांडणार आहे. ठाणे महापालिकेचा स्वतंत्र विकास आराखडा होवून १८ वर्षाचा कालावधी लोटला. त्यानंतर अनेक आराखडे सभागृहात दुरूस्तीसाठी आले, मी सभागृहास विनंती करतो की, काही महत्वाच्या सुधारणा आणि बदल वगळले तर मंजूर झालेल्या विकास आराखड्यात त्याची पूर्तता झाली आहे का? खारेगांव सेक्टर ८ मधला रोड आहे, दत्तवाडी एसएमजोशी मार्ग. याबाबत मी सतत सात वर्षे सभागृहात बोलतो आहे की तो रोड होणे गरजेचे आहे. आपण पहिला टप्पा हा स्वामी समर्थ मठ ते करूणा अपार्टमेंट घेतलेला आहे. पण खारेगांवच्या दृष्टीकोनातून पाहिलेतर आपण प्रत्यक्ष खारीगांवमध्ये या. मला वाटतं आयुक्त साहेब मागच्या आठवड्यात येऊन गेले. त्यांनी खारीगांव पाहिले नाही, पारसिकनगरमध्ये जावून पाहिले. स्थानिक नगरसेवकांना आम्हाला बरोबर घेवून गेले असते तर आम्ही त्यांना दाखवू शकलो असतो. मा. महापौर महोदय, मी आपल्याला आणि आयुक्तसाहेब पत्र दिले आहे. तुम्ही प्रत्यक्ष येवून पाहणी करा कारण खारीगांवमध्ये एकमेव रोड आहे काशा माने मार्ग खारेगांवमध्ये संध्याकाळी चालणेसुध्दा मुश्कील झालेले आहे. कारण

भिवंडीकडून नवी मुंबईला येणाऱ्या गाड्या आहेत त्या खारेगांव बायपासमधून येतात. किंवा नवी मुंबईतून भिवंडीला गाड्या जात असतात. त्यामुळे हे रोड होणे गरजेचे आहे. जो पहिला टप्पा आहे याबाबत आपल्या दालनात मिटींग झालेली आहे, त्यावेळी पहिला टप्पा जो घेतलेला आहे त्यासाठी आपण दोन कोटीची तरतूद केलेली आहे. दुसरा टप्प्यात करूणा ते ओमकार सोसायटीसाठी ४ कोटीची तरतूद करण्यात यावी. खारेगांवच्या दृष्टीकोनातून तो रोड होणे गरजेचे आहे. तसेच आपण ठाणे महानगरपालिकेची शाळा आहे, त्याचा दर्जा सुधारला पाहिजे ही गरज आहे. संपूर्ण ठाणे शहरामध्ये आपण झोपडपट्टी वसाहती, चाळीत राहणारा मध्यमवर्ग वाढत्या महागाई आणि बेकारीमुळे मुलांना आजही पालिका शाळांमध्ये शिकवत आहेत. खेदाची बाब म्हणजे ठाणे महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ स्वतंत्र असतानाही, पालिका व राज्यशासन अनुदान देत असतानाही शिक्षणाचा दर्जा मात्र अत्यंत सामान्य आहे ही खेदाची गोष्ट सभागृहाला सांगावीच लागणार आहे.

महापौर महोदय, आपण खारेगांव परिसर पूर्वी गांव होते. आज खारेगांवची लोकसंख्या ४० ते ५० हजारावर झालेली आहे. हे उपनगर झालेले आहे. लाखोची वसाहत असं या विभागाचे वर्णन होते. प्रॉपर्टी कार्ड, सिटी सर्व्हे, तसेच कन्व्हेअन्स असे अनेक प्रश्न या भागात प्रलंबित आहेत. आपण या ठिकाणी लक्ष देवून गेल्या ७-८ वर्षापासून सर्वेक्षण होऊनही संबंधितांना अद्याप पावती प्रॉपर्टी कार्ड दिले गेले नाहीत. यामुळे मोडकळीस आलेली घरे नव्याने बांधण्याबाबत प्रश्नचिन्ह उभे राहत आहे आणि म्हणून लोकांना गरजेपोटी अनधिकृत घरे बांधावी लागत आहेत.

खारेगांवमध्ये वास्तुआनंद जी आहे. आपण एस.एम जोशी मार्गाने जातो. त्या ठिकाणी २००४ ला भुयारी मार्ग मंजूरी झालेला आहे. एकूण ९४ लाख रूपये खर्च येणार होता पण आजपर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने त्या ठिकाणी जावून साधी दखल सुध्दा घेतलेली नाही. आज २०१४ आहे. त्या ठिकाणी पारसिकनगर असेल किंवा पूर्वेकडे जाणाऱ्या रहिवाशांना त्याचा फायदा होवू शकला असता. छोट्या कार जावू शकल्या असत्या, सायकल जावू शकल्या असत्या, खारेगांवला उड्डाणपूल होईल, त्याला वेळ लागणार आहे, पण त्या आधी हे होणे गरजेचे होते. तसेच बुधाजी पाटील मार्ग रोड आहे, संपूर्ण डोंगरावरून पाणी येत असतात. काल परवा पाऊस पडल्यानंतर त्या ठिकाणी दोन ते अडीच फूट पाणी होते. वास्ताविक गटाराचे रूपांतर नाल्यात करणे गरजेचे आहे. नाला बांधल्यानंतर त्या ठिकाणी संपूर्ण बुधाजी पाटील मार्ग ते खारेगांवातून पाणी येणारा रस्ता ते थेट विठ्ठल मंदिर आहे, त्या डिपी रोडने जर नाला बांधला तर पाणी जावू शकते हे आपणांस सांगू इच्छितो.

मुंब्रा प्रभाग समितीमध्ये माझ्या माहितीनुसार कळवा खारेगांव या भागामध्ये आज कळवा प्रभाग समितीत ४० इमारती आहेत आणि जेमतेम १०० ते १२५ चाळी आहेत. त्यांना टॅक्स लावलेला नाही. एलबीटी हा प्रश्न गंभीर आहे. पैसे जमा होत नाहीत. पण आपण त्यांना जर टॅक्स लावला असता, तर आपले उत्पन्न वाढले असते. मुंब्रा, दिवा प्रभाग समितीमध्ये आज ३७६ इमारती आहे, सन्मा सदस्य सुधीर भगत बोलले ३७६ इमारती आहेत त्या ठिकाणी पाच वर्षापासून टॅक्स लावलेला नाही. टॅक्स देणारे लोक आहेत, पण आपण लावत का नाही? आपले प्रशासन काय करते ते लावणे गरजेचे आहे. तर स्मशानभूमीसंदर्भात बोलले, खारेगांवमध्ये ५० ते ६० हजार वस्ती आहे, आपण संपूर्ण हा परिसर पाहिल्यानंतर बाजूला असणारे स्लम, शिवशक्तीनगर, इंदिरानगर, लासेंचा किंवा साप्तेचा वॉर्ड असेल, एखादी घडल्यानंतर खारेगांवमध्ये मयत आणावे लागते. आपली त्या ठिकाणी अनेक कामे झालेली आहे, तसेच त्या ठिकाणी स्मशान बांधणे उचित आहे हे सांगू इच्छितो. आपण अनेक कामे केलेली आहे, ती करत असताना एक लक्षात येते की, आपल्याकडे ज्या जाहिराती केल्या जातात एकूण ठाणे शहरामध्ये मालमत्ता करासंदर्भात बोलले तर कराची वसुली करत असताना अनेक मालमत्ता कर असे आहेत की त्याचे वास्तववादी ऑडिट झालेले नाही. विकासकांनी महापालिकेला चुना लावलेला आहे अशी परिस्थिती आहे. एक संयुक्त टीम जी पालिकाहद्दीत सर्व इमारती, चाळी बंगले, गाळे संपूर्ण मॉल्स थिएटर, राहती घरे, दुकाने यांचे सखोल ऑडिट करावे, पुनर्रनोंदणी करावी आणि त्यानंतर मालमत्ता कराची आकारणी करावी सर्व

नऊ प्रभाग समित्यांची अंतर्गत असलेल्या मालमत्तेची नव्याने मोजणी करावी. शेकडो मालमत्तांचा नव्याने शोध लागेल, काही चोऱ्या उघड होतील. तर ज्यांनी वर्षानुवर्षे मालमत्ता कर भरलेला नाही हे उघड होईल आणि महापालिकेच्या तिजोरीत नक्कीच महसूल वाढेल. उत्पन्न वाढीचे आणखी उपाय म्हणजे ठाणे महापालिकेच्या सर्व वास्तूंचे ऑडिट करणे गरजेचे आहे. मोकळ्या जागा, भूखंड यांचे संरक्षण, बंद पडलेली शॉपिंग सेंटर्स, गाळे, इमारती याचा योग्य वापर होत नाही. याचे संपूर्ण ऑडिट झाल्यास रिकामे गाळे, इमारती वास्तूयोग्य निविदेद्वारे भाडेतत्वावर दिल्यास महसूल वाढू शकतो. काही खाजगी संस्थां अनेक वास्तूंचा वापर मोफत किंवा नाममात्र भाडेतत्वावर सुरू ठेवल्याने पालिकेचे उत्पन्न बुडाले आहे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आपण जाहिरात फलकाविषयी अंत्यत महत्वाची सूचना करतो पालिका अधिनियमात उल्लेख आहे की, ज्या ठिकाणी होर्डिंग्ज उभे करायचे आहेत. त्यांचा ७/१२ उतारा गरजेचा आहे. आज दुर्देवाने शहरात हजारो होर्डिंग्ज नियमबाह्य उभे आहेत. त्याचे लाखो रूपयांचे उत्पन्न गळतीद्वारे गायब होते, यापुढे होर्डिंग्जचे टेंडर काढताना मागील दहा वर्षे ज्यांना होर्डिंग्जची टेंडर दिली गेली. त्यांनी हे नियमबाह्य काम केले व पालिकेचे करोडो रूपयांचे नुकसान केले त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात राहून दंड आकारल्यास राजकीय हस्तक्षेप होवू शकतात पण पालिकेच्या हितासाठी हस्तक्षेप करून पालिकेचे उत्पन्न वाढवावे ही विनंती.

डंपिंग संदर्भात आपण डायघरला अनेक प्रयत्न केले. डंपिंग संदर्भात अनेक चर्चा होत आहे, चर्चा होत असताना डंपिगकरता डायघर व खारेगांव येथील भूखंडासाठी करोडो रूपये मोजले, पण कुठलीही गोष्ट विश्वासात घेवून करायला पाहिजे होती पण ते होवू शकले नाही. आपण मला बोलण्यास संधी दिलीत मी माझे शब्द संपवितो.

जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्रीमती नंदिनी विचारे :**

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त सो, मा. स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते सर्व सन्मा. नगरसेविका व नगरसेवक आणि पत्रकार बंधू,

सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक आपल्या समोर मा. सभापती श्री. सुधाकर चव्हाण यांनी सादर केले. महापालिकेचे स्वत:च्या महसूलात एलबीटीचा मोठा वाटा आहे. त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात घट येते याबाबत शासनस्तरावर जो काही निर्णय होईल तो महापालिकेच्या आर्थिक फायद्याचा असेल की नाही हे आताच सांगता येणार नाही. त्यामुळे इतर उत्पन्नाच्या साधनांवर भर देणे गरजेचे आहे. या वर्षी स्पीलओव्हर बराच पैसा वापरला जाणार आहे. ठाणे नगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम नाही हे आपल्याला बजेटवरून समजले असेलच. ठेकेदारांना केलेल्या कामांच्या देयकांचे प्रदान झालेले नाही. ती अदा करणेसाठी निधी अपुरा आहे. त्यामुळे नवीन कामे करावयाची झाल्यास उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आहे. त्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. एखादी योजना मंजूर झाली तर बजेट आल्यावर मंजूर होईपर्यंत जून, जुलैला सुरूवात होते. तोपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कार्यादेश मिळेपर्यंत ऑगस्ट, सप्टेंबर महिना निघून जातो. या सर्व गोष्टीमध्ये पहिले संपूर्ण वर्ष निघून जाते आणि परत नवीन वर्षाचे प्रकरण सुरू होत. या सगळ्या प्रक्रियेची अंमलबजावणी झटपट झाली तरच जनतेला सगळ्या सोयीसुविधा उपलब्ध केल्या जातील.

मा. महापौर महोदय, अर्थसंकल्पातील काही महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

ठाणे महापालिकेला उत्पन्नाचे स्त्रोत ज्या टॅक्सद्वारे मिळते तो ठाणे शहरातून सर्वात जास्त टॅक्स भरला जातो. नागरिकांना दीड ते दोन तास रांगेत उभे राहून पाणीपट्टी कर भरतात. प्रशासनाने याबद्दल कुठेही भेदभाव न ठेवता करवसुली केली पाहिजे आणि विकासाची कामे करवसुली जास्त अवलंबून असतात हे ही लक्षात घ्यायला पाहिजे. करवसुली प्रमाणे पाणीबिल हा देखील महत्वाचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे.

राज्यात भीषण दुष्काळाचे सावट पडले आहे, भीषण पाणी टंचाई आहे. त्यादृष्टीने माणुसकीच्या दृष्टीकोनातून पाण्याचा अपव्यय टाळणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. ठाणे महापालिकेच्या स्थावर मालमत्ता आहे. उदा. कलादालन, मार्केट, गाळे, नाट्यगृह या वास्तूंच्या देखभाल दुरूस्तीवर जास्त भर दिला तर त्यामुळे स्थावर मालमत्तांपासून उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

ठाणे शहराची लोकसंख्या १९ लाखांच्या वर गेली आहे. शहरातील ५ ते ६ लाख लोकांसाठी एकमेव जवाहरबाग स्मशानभूमी आहे. सुमारे ४०/५० वर्षापूर्वी ही स्मशानभूमी बांधण्यात आली आहे. जवाहर स्मशानभूमीची जागा अतिशय अपुरी असल्यामुळे नागरिकांना तेथे ५ ते ६ तास उभे रहावे लागते. लहानमुलांना दफन करण्यासाठी जागा मिळत नाही. त्यामुळे जवाहरबाग स्मशानभूमीचे विस्तारीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. जवाहरबाग स्मशानभूमीच्या विस्तारीकरणाची जागा उपलब्ध होवून अत्याधुनिक स्मशानभूमी तयार करावी जेणेकरून स्मशानभूमीत सर्वसोयी उपलब्ध होतील, त्यासाठी आर्थिक वर्षामध्ये तरतूद करण्यात यावी ही नम्र विनंती. तसेच गणपती मंदिर ते स्टेशन रोड परिसरातील फेरीवाल्यांचा प्रश्न फार गंभीर झाला आहे. त्यामुळे वरील रस्त्यावरून चालणे फार त्रासदायक झाले आहे. दुकानासमोर फेरीवाले बसल्यामुळे दुकानमालक ही त्रासलेले आहे प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी.

नौपाडासारख्या गजबजलेल्या ठिकाणी लहान मुलांना व सिनियर सिटीझन गार्डनची व्यवस्था नाही. तेथील रहिवाश्यांना सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी मैदानाची पुरेशी जागा नाही. मुलांना खेळायला एखादे मैदान असले तरी ते पुरेसे आहे. म्हणून जी मैदाने अस्तित्वात आहेत त्याचे सुशोभिकरण व विकास करणे गरजेचे आहे. रमाबाई नगर येथील गार्डनचे सुशोभिकरण करून एलईडी लाईट लावणे, गणेशवाडी येथील गार्डनचे सुशोभिकरण करणे, कोलबाड येथील वीर सावरकर मैदान, खुला रंगमंच, व्यायामशाळा, वाचनालय, जॉगींग स्ट्रॅक याकरिता बजेटमध्ये तरतूद करणे.

माझ्या प्रभागातील सिध्देश्वर तलाव साफ करणे, त्यातील वनस्पती काढणे, फिल्टर मशीन लावणे, तसेच सभोवताली स्ट्रीट लाईट लावणे, तसेच काही ठिकाणी कंपाऊंड वॉल पडलेल्या आहेत त्यांची दुरूस्ती करून रंगरंगोटी करणे, तसेच सिध्देश्वर तलावाशेजारील उद्यानामध्ये नवीन लाद्या बसवून सुशोभिकरण करणे इत्यादी कामाचा देखील अंतर्भाव करण्यात यावा.

मर्दाडे तलाव सुशोभिकरण करणे तसेच तलावाजवळील दुकानांचे पुनर्वसन करून त्याचे तलावपाळीसारखे रूपांतर करून नागरिकांना खुला करून देणे. ब्रम्हाळा तलावासाठी बजेटमध्ये देखील तरतूद करणे अशी मी आपल्याला नम्र विनंती करीत आहे.

महिला व बालकल्याण योजना - गेली २ वर्षे महिला बालकल्याण योजनेतंर्गत नागरिकांसाठी योजना राबवितो परंतु त्याचा निधी उपलब्ध नसल्यामुळे त्या योजना नागरिकांपर्यंत पोहचत नाही. महिला बालकल्याण योजनांची त्वरीत अंमलबजावणी करावी, तरच त्याचा लाभ शहरातील महिलांना होईल. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कराटे प्रशिक्षण सारख्या योजना प्रभावीपणे राबविल्यास महिला स्वसंरक्षणार्थ सक्षम होतील.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात पार्किंगची समस्या फार मोठी आहे. रस्त्यावर पार्किंग केली जात आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन प्रचंड वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे ठाणे शहरात ज्या ज्या ठिकाणी पार्किंग आरक्षित आहे ते पार्कींग प्लॉट विकसित करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने रोडच्या कडेला असलेल्या फूटपाथ किंवा रस्त्याच्या बाजूला असलेले छोटे प्लॉटस् स्टॅक पार्कींग सुविधा तयार करणे गरजेचे आहे. तसेच जुने महापालिकेचे कार्यालय तोडून त्या ठिकाणी पार्किंग प्लॉट तयार करण्यात यावे. आज बाजारपेठेमध्ये कुठेही पार्कींगकरिता जागा उपलब्ध नाही. सद्यस्थितीत लोकांना गर्दीतून बाजारपेठेत जाणे मुश्कील होत आहे. सिध्दीविनायक मंदिर ते स्टेशनपर्यंत प्रचंड गर्दी असल्यामुळे वाहतुक

कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच ठाणे शहरात मासुंदा तलावाजवळील गडकरी रंगायतन शेजारच्या एमजीपीचा भूखंड ठाणे महानगरपालिकेकडे होता. एमजीपीने हा भुखंड आपल्या ताब्यात घेतला. ती जागा रिकामी करून तेथे एमजीपीला सुविधा भूखंड देवून अथवा टीडीआर किंवा तयार भुखंड देवून पार्किंगची सुविधा करण्यात यावी. जेणेकरून गडकरी रंगायतन, तलावपाळी, सेंटजॉर्ज हायस्कूल परिसरातील पार्किंग दूर होवू शकेल. तसेच बाजारपेठकडे जाणाऱ्या लोकांना वाहतुकीजा जो अडथळा निर्माण होतो तो दूर होईल. तसेच रस्ते वाहतूकीस उपलब्ध होतील. त्यासाठी यावर्षीच्या बजेटमध्ये कोटीची तरतूद करण्यात यावी.

महानगरपालिका क्षेत्रात पॉवर सेव्हर स्ट्रीट एलईडी लाईटस् लावणे : ठाणे महानगरपालिकेने काही वर्षापूवी सरकारी इमारती या संवर्गामध्ये प्रभावी उपाययोजना केल्याबद्दल उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय उर्जा पुरस्कार, केंद्र सरकारचा मानांकित पुरस्कार देऊन गौरव केला होता. ठाणेकर जनतेचे ९ कोटी रूपये वाचवून उर्जा बचतील प्राधान्य देण्याचे काम महापालिकेने केले होते. त्याच धर्तीवर पुढे स्ट्रीट लाईट पॉवर सेव्हर, सौर उर्जेचा वापर करून ठाणे महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये उर्जानिर्मिती, कचऱ्यापासून, टाकाऊ भाजीपाला या टाकाऊ पदार्थातून उर्जानिर्मिती करून हॉस्पिटल करिता लागणारा गॅस यासारखे बायोमिथेनायझेशन प्रकल्प ठाणे महापालिकेने राबविलेले आहेत. त्याच पध्दतीने ठाणे शहरात महापालिकेची उद्याने व सार्वजनिक ठिकाणी पॉवर सेव्हर स्ट्रीट एलईडी लाईट लावण्यात याव्यात. यातून महापालिकेच्या विजेच्या बिलाची व मोठ्या प्रमाणावर विजेची बचतदेखील होईल.

तसेच ठाणे शहराचा मध्यवर्ती आनंदनगर ते कापूरबावडी पूर्वद्रुतगती महामार्ग येथे सन १९९८ साली सोडीयम व्हेपर दिव लावण्यातआले असून सदरचे पोल खूप जुने , गंजलेले असून नादुरूस्त आहेत. त्यामुळे रस्त्यावरील अपुऱ्या प्रकाशामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यास्तव पहिल्या टप्प्यामध्ये आनंदनगर ते कापूरबावडी पूर्वद्रुतगती महामार्गावर उर्जा कार्यक्षम, पर्यावरणाभिमुख एलईडी लाईट लावणे गरजेचे आहे. त्यामुळे विजेची बचत देखील होईल.

मागील अर्थसंकल्पात कळवा हॉस्पिटल करिता भांडवली कामासाठी रूपये ९ कोटींची तरतूद करण्यात आली होती. या अर्थसंकलात ७ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. हॉस्पिटलमध्ये डायलेसीसची सुविधा करण्यात आली आहे. परंतु हृदयरोगावरच्या शस्त्रक्रिया अजूनही हॉस्पिटलमध्ये सुरू नाहीत. त्यामुळे शस्त्रक्रियेसाठी मुंबईला जावे लागते. भूलतज्ञ नसल्यामुळे कित्येक शस्त्रक्रिया होत नाहीत. ॲडव्हान्स उपकरणांची तातडीने गरज आहे. हृदयरोगावरच्या शस्त्रक्रिया हॉस्पिटलमध्ये सुरू केल्या तर त्याचा रूग्णांना फायदा होणार आहे.

ठाणे शहरात ६०० ते ६५० टन घनकचरा निर्माण होतो. डंपिंग स्टेशनची गंभीर प्रश्न लक्षात घेता घनकचरा संकलनाच्या अनुषंगाने बायोमिथेनायझेशन प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प, प्लॅस्टिक पुनर्वापर प्रकल्प, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प इ. प्रकल्प जर आपण राबविले तर हा डंपिंग स्टेशनचा गंभीर प्रश्नामध्ये आपण बायोमिथेनायझेशन प्रकल्प प्रत्येक प्रभाग समिती निहाय तयार केल्यास कचऱ्याची विल्हेवाट प्रत्येक समितीस्तरावर होईल. असे झाले तर डंपिंगसारख्या गंभीर प्रश्नापासून थोडी सुटका मिळेल आणि घंटागाडीच्या खर्चात बचत होवून सदरची रक्कम प्रकल्प कार्यान्वित ठेवण्यासाठी होईल. या आर्थिक वर्षात नागरिकांच्या हिताचे जास्तीत जास्त निर्णय घेवून महापालिका प्रशासन नागरिकांना योग्य त्या सोयीसुविधा पुरविण्याचे कार्य करीत असा मला आत्मविश्वास वाटतो. तसेच उपवन फेस्टीव्हलसाठी महापालिकेने ४ कोटीची तरतूद केली आहे असे मी म्हटले. त्याच्यासंदर्भात मला असे वाटते की, आपण ४ कोटी खर्च करून प्रायव्हेट संस्थेला देण्यापेक्षा आपण जर स्वतः राबविला तर त्याचे जे उत्पन्न येईल त्याचा फायदा महापालिकेला होईल त्याबाबत आपण विचार करावा.

मा. महापौर, सन्मा. नगरसेवकांनी केलेल्या सूचनांचा विचार हे बजेट मंजूर करावे, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते.

जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्रीमती मालती पाटील :**

सन्मा. महापौर महोदय, आजचा जो २०१४- २०१५ चा अर्थसंकल्प मांडून त्यात बऱ्याच गोष्टींचा उल्लेख करून बऱ्याच समस्या आजपर्यंत होत्या, त्या मांडलेल्या आहेत. त्याबद्दल मी सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह नेते, सन्मा. विरोधी पक्ष नेते तसेच सभेतील सर्व सदस्य,

आज इथे आल्यानंतर आम्ही बरेच नवीन सदस्य आहेत, बजेटची मिटींगबद्दल एक आशा असते. नवीन कामे, आमच्या प्रभागात काहीतरी नवीन सुधारणा, आज माझ्यातर्फेच नाही तर इथे बसलेल्या बऱ्याच महिला आहेत. आज सकाळपासून चर्चा सूरु आहेत. आपण जे महासभेमध्ये बोलतो किंवा आपण महासभेत आपल्या व्यथा मांडतो तर त्याचा काहीतरी उपयोग होतो का? सन्मा. महापौर महोदय मी आपल्याला विनंती करेन की, खरेच आज जी बजेटची जी तरतूद पास होत आहे. जे करोडो रूपयांचे असतात, आज बऱ्याच नगरसेवकांना, जे लोकप्रतिनिधी आहेत या बऱ्याच आशा आकांक्षा घेवून बसलेले असतात आणि हे बजेट जेव्हा पास होते. तेव्हा मला असं वाटतं कुठेतरी विकास होताना तो एकाच ठिकाणी होतो की सर्व नगरसेवक जे इथे बसलेले आहेत. त्याच्या प्रत्येक विभागामध्ये होतो याकडे देखील जर जास्तीत जास्त लक्ष दिले तर मला वाटत नाही की जे आपण म्हणतो की, सुंदर ठाणे आणि स्वच्छ ठाणे आहे. गणपती आले की रस्त्यांवरती खड्डे की खड्डयावरती रस्ते आहेत. या व्यथा संपूर्ण आम्ही प्रत्येकवेळेला मांडतो तर ती मांडायची मला वाटतं वेळ येणार नाही. जेव्हा अर्थसंकल्प आम्ही वाचला, तेव्हा त्यात बऱ्याच गोष्टी दिसल्या की त्याच्यात रस्ता रूंदीकरणाची, पाणीपुरवठा सारखा उल्लेख केलेला आहेत. तर सन्मा. महापौर महोदयांनी मी आधी तुम्हाला सांगेन की, पाणीपुरवठ्याचा जो विषय इथे आहे तर त्याचा अपेक्षित खर्च हा २४४.२९ कोटी खर्च दाखविलेला आहे आणि जी सेवा आपण लोकांसाठी देतो ती जमा होणारी रक्कम १४१.४६ कोटी इतकी आहे. तोट्याची रक्कम ही १०२.८३ कोटी इतकी आहे.

सन्मा. महापौर महोदय, १०२.८३ म्हणजे काही कमी रक्कम नाही. तर मला असं म्हणायचे आहे. या रकमेमध्ये जर ठाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये जर वाढ करायची असेल तर आपण जे ९५ चे जे पुरावे लोकप्रतिनिधी जेव्हा इथे कनेक्शनसाठी येतात आणि जेव्हा त्यांना कनेक्शन पाहिजे असते तेव्हा ९५ चे पुरावे द्या ही, हे कागद आणा असे सांगून आपण त्यांना परत पाठवतो. लोकप्रतिनिधीही पाणी इकडून किंवा तिकडून कुठूनतरी पितच असतात. त्यामुळे या पाण्याच्या चोऱ्या जास्तीत जास्त वाढत चालल्या आहे. यावर कुठेतरी बंधन घालायचे असेल, ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्यामध्ये जर उत्पन्नाची वाढ करायची असेल, तर लवकरात लवकर जे पुराव्यांचे जे बंधन घातलेले ते साईडला ठेवून त्यांना जास्तीत जास्त नवीन कनेक्शन देवून ही उत्पन्नात वाढ कशी होईल याकडे जास्त लक्ष दिले तर त्यात वाढ होईल. त्याचप्रमाणे अभय योजना राबविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. रस्तारुंदीकरणाच्या ज्या गोष्टी घेतलेल्या आहेत, त्या अतिशय महत्वाच्या आणि उपयोगी आहेत.

सन्मा.महापौर महोदय, या गोष्टी आपल्याला माहिती असतील. रस्तारूंदीकरण करण्यासाठी, ठाणे शहराच्या शहर विकासाच्या नकाशामध्ये जे रस्ते दाखविले आहेत, एखाद्या ठिकाणी विकास सुरू असताना त्या ठिकाणी रस्ते मंजूर होतात. त्यावेळेला तो रस्ता मंजूर करताना त्याचा विकास होताना तो रस्ता तिथे ठेवलेला आहे की नाही याच्यावर आजपर्यंत कोणी लक्ष दिलेले आहे की नाही मला माहिती नाही. परंतु मी माझ्या प्रभागाचे सांगते. आजपर्यंत मला वाटतं आपल्याला देखील माहित असेल, सभागृहनेत्यांना देखील माहित असेल, विरोधी पक्षनेत्यांना माहित असेल, सगळ्यांना हा प्रश्न माहित आहे, आणि त्याच्यासाठी गेल्या १०/१२ वर्षापासून तेथे वाद चालू आहे. मला असे वाटते की, जर शहर विकासामध्ये एखादा रस्ता

नमूद केलेला आहे, तो जर ४० फूटाचा असेल किंवा ४० डिपीचा असेल आणि तेथे तीस फूटाचा ठेवलेला असेल आणि विकासकाने तेथे बिल्डिंग बांधल्या असेल. आपण ती बिल्डिंग आता तोडा किंवा कसा तो रस्ता घ्याल. परंतु मी आपणांस विनंती करते की, जेव्हा आपण इथे मंजुरी देतो किंवा रस्त्यांसारखे चांगले कोट्यावधी रूपये संपवितो तेव्हा असे ठराव करा की, ज्यावेळेला तिथे नकाशामध्ये जेवढे रस्ते आहेत, जेवढा दाखविलेला डि.पी रोड आहे, त्या एरियामध्ये त्या विकासकाने सोडलेला आहे याची त्याच वेळेला शहानिशा केली तर मला असे वाटते की हे प्रॉब्लेम जास्तीत जास्त होणार नाहीत. आता जे मंजूर झालेले रस्ते आहेत, कोट्यावधी रूपये त्यासाठी गेलेले आहेत, ते रस्ते अर्धेच राहिलेले आहेत. रस्त्यामध्ये खड्डे की खड्डयामध्ये रस्ते ते कळत नाही. दोन शाळा जवळ आहेत. मुलांचे इतके हाल होत आहेत की मला असे वाटते डांबरीकरण देखील पावसाळ्याआधी करायला सांगितले. बरेच फोन प्रभाग समितीमध्ये केले. परंतु तेथूनही कोणी आलेले नाही. म्हणून तुमची एक व्हिजीट देखील ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे सन्मा.महापौर महोदय, अपंगासाठी जे आपण अनुदान ठेवलेले आहे त्याबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानीन. अपंगांसाठी आपण जे १००% अंधासाठी आणि अपंगासाठी आरक्षण ठेवलेले आहे, ते अतिशय चांगले आहे. आजपर्यंत असा ठराव मंजूर किंवा तरतूद मंजूर झालेली नव्हती. परंतु एखाद्या घरातील मुलगा गरीब आहे, परंतु त्याच्या आईकडे सगळेच पुरावे नाही, जे बंधनकारक आहे, सर्व कागद असताना एखादा कागद कमी असेल, तो मुलगा १००% अपंग असेल तर त्याच्यासाठी एवढी तरतूद आपण कोट्यावधी रूपयांची पास करतो ती तिथंपर्यंत पोहचण्यासाठी एखादा कागद त्या व्यक्तीकडे नसेल तरी त्याचा लाभ त्याला घेता. यावा यासाठी काहीतरी तरतूद मंजूर करून घ्यावी अशी मी माझ्यावतीने अपंग घरातील नागरिकांतर्फे आपणांस नम्र विनंती करीत आहे.

त्याचप्रमाणे बालकल्याण योजना जे आजपर्यंत राबवित गेलेलो आहोत आणि २० कोटींची मंजूरी दिलेली आहे. सन्मा.महापौर महोदय, मी म्हणेन की, आज इथे बऱ्याच महिला आहेत, प्रत्येक प्रभागामध्ये बालकल्याण योजना राबविली जाते, कोट्यावधी रूपये आपण पास करतो. हे कोट्यावधी रूपये पास करताना प्रत्येक प्रभागामध्ये महिला बचत गटांना तेवढी रक्कम जाते की तेवढी शिल्लक राहते ते माहित नाही. परंतु मी आपल्याला सांगेन आता जे तुम्ही जो उल्लेख केलेला आहे, २०१४-१५ ते २०१८-१९ म्हणजे पंचवार्षिक योजना. तर याचा अर्थ मला सन्मा.महापौर महोदय, मी दोनदा अर्थसंकल्प वाचला. परंतु पंचवार्षिक योजना म्हणजे काय? नक्की ते मला कळलेले नाही. नक्की या योजनेत काय करणार आहेत, आपले जे बचत गट आहेत, त्यांच्यासाठी काहीतरी कामांच्या योजना करणार आहेत की त्यांना काहीतरी कामे देणार आहे, की एखादी आरक्षण भूखंडामध्ये एखादा कंपनी वगैरे खोलून त्या महिलांना उद्योगधंदा देणार आहेत, ते कळलेले नाही. माझे काही चुकले असेल तर मला माफ करा. मी एक महिला आहे आणि महिलांच्या समस्या आज मांडते आहे. बऱ्याच महिलांचे बचत गट आमच्याकडे असतात. त्यामुळे ती योजना त्यांच्यापर्यंत कशी पोहचविता येईल यासाठी आमची धडपड असते, परंतु ती योजना जर मलाच कळली नाही तर मी ती महिलांपर्यंत कशी घेवून जाणार. तर त्याच्यासाठी एखादे परिपत्रक काढा की ही योजना म्हणजे काय? तर ते आम्हाला कळेल.

त्याचप्रमाणे सन्मा. महापौर महोदय, आपण जे तळयाचे सुशोभिकरणाचा जो उल्लेख केलेला आहे, आणि त्या तलावामध्ये जे हरिओमनगरचे तलाव घेतलेले आहे, त्याबद्दल मी माझ्यावतीने, कोपरी गावातील सर्व जनतेच्या वतीने आपले मनापासून आभार मानेन. दुसरी गोष्टी म्हणजे, जे स्मशानभूमीचे नुतनीकरण आपण सांगितलेले आहे. तर खरंच अत्यावश्यक ज्या गोष्टी आहेत, त्या इथे मांडलेल्या आहेत. परंतु आपण कोट्यावधी रूपये लाखो रूपये खर्चुन एखादे स्मशानभूमी सुशोभिकरण करतो. हे सुशोभिकरण झाल्यानंतर तिथे एखादा जर सुरक्षारक्षकच नसेल तर त्या स्मशानभूमीमध्ये जे मोठे मोठे चुल्हे आहेत. मी सुशोभिकरण केलेले आहे, सुशोभिकरण करता करता दोन वेळेला त्या प्लेटस् चोरीला गेल्या आणि त्यासाठी मला पुन्हा पुन्हा मागणी करावी लागली. मी आपणांस विनंती करेन जेव्हा जेव्हा आपण एखादी स्मशानभूमी सुशोभिकरण करतो, तर आपण त्या त्या वेळी सुरक्षा रक्षक जर आपल्याला २४ तासासाठी मिळत असतील तर खूपच छान होईल, त्यामुळे चोरी होणार नाही. ठाणे महानगरपालिकेला जो बारंवार

खर्च करावा लागतो त्याच त्याच गोष्टींसाठी. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. ज्या गोष्टींचा आपण यात उल्लेख केलेला आहे आणि आम्ही ज्या सर्व सदस्यांतर्फे मी आपणांस सांगेन की, बजेट जेव्हा आपण पास करतो तेव्हा कळत नाही की ते कोणत्या विभागात जास्त जाते की जात नाही ते मला माहित नाही. परंतु मी असं सांगेन प्रभागवाईज जर बजेट जात असेल, अमूक अमूक एवढा प्रभाग आहेत, आणि त्या प्रभागाला एवढे बजेट डिव्हाईड करून जात असेल तर त्या त्या प्रभागात सुधारणा होईल आणि कुठलाच प्रभाग वंचित राहणार नाही. बरेच विभाग असे असतात की जिथे एका ठिकाणी होते तर त्या तशा होणार नाही, ठाणे महापालिकेचे नाव आजपर्यत चांगले प्रकारे सुंदर म्हटले आहे तिथे त्यात अजून भर पडेल. मी सन्मा. महापौर महोदय, सन्मा, उपमहापौर, सन्मा आयुक्त साहेब, सन्मा सभागृह नेते, सन्मा. गटनेते, सन्मा. माझे पत्रकार बंधू भगिनी आणि प्रशासन तुमचे सगळ्यांचे मनापासून आभार व्यक्त करते. दोन शब्द संपविते.
जयहिंद जयमहाराष्ट्र !

**श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंग :**

सन्मा. महापौर महोदय, सन्मा उपमहापौर, आयुक्त साहेब, सभागृह नेते, विरोधी नेते, गटनेते, सर्व नगरसेविका, नगरसेवक, पत्रकार बंधु भगिनीनों,

महापौर महोदय, माझा प्रभाग एकदम डोंगरभाग आहे. मी सारखे बोलते दरवर्षीच्या बजेटच्या महासभेत मी भाषण करते. तरी गेल्यावर्षी जूनमध्ये त्या डोंगरभागाची भिंत पडली होती. त्यावेळी जूनमध्ये काम केलेल्या ठेकेदाराला अजूनही बिल मिळालेले नाही. त्या भागामध्ये कमीत कमी १० कोटीची गरज आहे.

महापौर महोदय, डोंगरभाग निधी कुठे दिसत नाही. तरी मी आपल्याला विनंती करते की, प्रभाग क्र. १२ साठी डोंगरभाग निधी उपलब्ध करून द्यावा. आमच्या येथील रूपादेवी मैदानाबाबत मी वारंवार बोलते. रूपादेवी मैदान ठाणे महानगरपालिकेने ७२ लाख रूपये टाकून १० वर्ष अगोदर ते मैदान खरेदी केलेले आहे. मी त्या मैदानात समाजमंदिर व्हावे म्हणून मी वारंवार विनंती करते आहे. अजूनही त्या मैदानाचे काही होत नाही. त्याबाबत केस चालू आहे. १० वर्ष लागतात वकीलाला केस लढायला. का फायनल होत नाही त्या मैदानाबाबत. १० वर्ष झाली त्याबाबत कोणीतरी कोर्टात जातो, खोटी कागदपत्रे दाखवतो. त्या मैदानाचा काही निकाल लागत नाही. माझी अशी मागणी आहे की, त्या मैदानामध्ये समाजमंदिर व्हावे. आजूबाजूला पुर्ण झोपडपट्टीचा विभागआहे, झोपडपट्टीमधील नागरिकांना कळवा हॉस्पिटलला यायला वेळ लागतो. काहीतरी दुर्घटना होते. महापौर महोदय, मी एवढेच माझे दोन शब्द थांबविते.

जय हिंद जयमहाराष्ट्र !

**मा.महापौर सो. :-**

उदया दुपारी १२.०० वाजता आपण बजेटवर चर्चा कंटीन्यू करणार आहोत.

**(तद्नंतर मा.महापौर सो., सायंकाळी ठिक ०५.१५ वा. सभा स्थगित झाल्यांचे घोषित करतात.)**

(अशोक बुरपुल्ले)
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकुब झाल्याची वेळ सायं. ०५.१५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -१५/०७/२०१४**

सही/-
**(श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील)**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**